MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष विसावे / अंक ३ / मार्च २०१९

## संपादकीय

### न्युझीलंडचा नरसंहार - शोध आणि बोध

शुक्रवार, १५ मार्च २०१९ रोजी ख्राइस्टचर्च या न्युझीलंड येथील दोन मशिदींमध्ये ब्रेंटन टॅरेंटे (Brenton Tarrant) या श्वेतवंशवादानी (White Suprimacy) झपाटलेल्या तरुणाने अंदाधुंद गोळीबार केला. त्यावेळी या मशिदीत प्रार्थनेकरता जमलेले ५० मुसलमान मृत्युमुखी पडले आणि तेवढेच जखमी झाले. या हल्ल्यात बळी पडलेले नागरिक हे मुसलमान असले, तरी हा हल्ला फक्त मुसलमानांवर होता असे दिसत नाही.

गेली अनेक वर्ष इराक, सिरिया, अफगाणिस्थान आणि काही प्रमाणात भारतातही अनेक दहशतवादी हल्ले होत आहेत. ख्राइस्टचर्च (Christchurch) येथे झालेला हल्ला हा दहशतवादी होताच, पण त्याहीपेक्षा तो अधिक श्वेतवंशवादी होता. इस्लामिक कट्टरपंथीयांच्या संस्था व त्यांच्या कारवाया या पाश्चिमात्य माध्यमांचे आवडते विषय आहेत. पण याचबरोबर श्वेतवंशवाद व दहशतवादसुद्धा तेवढ्याच तीव्रतेने अमेरिकन व युरोपियन राष्ट्रांमध्ये आहे हे मात्र फार हळू आवाजात सांगितले जाते. जणू काही या घटना अत्यंत दुर्मीळ व अपघाती असतात. वास्तव यापेक्षा भिन्न आहे. म्हणून ख्राइस्टचर्चमध्ये झालेल्या हल्ल्याचे विश्लेषण होणे आपल्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

गेल्या १००-२०० वर्षात औद्योगिकीकरण व वैज्ञानिक प्रगतीमुळे जग खूप सुधारलं आहे, अशी एक भाबडी समजूत अनेक विचारवंत करून देत असतात. शहरांमधील मॉलची संख्या, किंवा विमानाचा सहज होणारा प्रवास हीच जर का सुधारणांची लक्षणं असतील तर ते काही प्रमाणात खरेही आहे. सहाजिकच या दृष्टीने अग्रभागी असलेली अमेरिका व इतर राष्ट्रे की जी सुबत्तेच्या शिखरावर आहेत, सांपत्तिक दृष्ट्या सधन आहेत, तिथे 'वंशवाद' किंवा 'दहशतवाद' अस्तित्वात असायलाच नको. भारत आणि इतर विकसनशील देशांना घसा फुटेस्तोवर मानवतेचे शिक्षण देणाऱ्या या राष्ट्रांमध्ये मात्र वंशवाद होताच असे नाही, तर आजही तेवढ्याच तीव्रतेने तो शिल्लक आहे.

माध्यमांना तो का दिसत नाही, हाच मोठा यक्ष प्रश्न आहे. तो दिसत नाही, की बघायचा नाही; हा त्याहीपेक्षा मोठा यक्ष प्रश्न आहे.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

न्युझीलंड हे राष्ट्र जगातल्या समाधान प्रिय राष्ट्रांच्या यादीमध्ये वरच्या क्रमांकावरती आहे. या देशाला कुणीही शत्रू नाहीत. म्हणून शांतताप्रिय राष्ट्रांच्या यादीत याचा क्रमांक वरचा आहे. तरीही या देशामध्ये ख्राइस्टचर्चसारख्या घटना, की ज्या श्वेतवंशवादानी प्रेरित होऊन होतात, याचे पुरेसे विश्लेषण होताना मात्र दिसत नाही. कारण विकसित आणि वैज्ञानिक प्रगतीमध्ये अग्रभागी असलेल्या या देशांमध्ये अशा घटना अपघातानेच होत असतील अशी भाबडी समजूत. दुर्दैवाने, इतिहासाची साक्ष मात्र काही वेगळंच सांगून जाते.

श्वेतवंशवादाचा 'प्रेरणास्रोत' व 'प्रभाव' हा जगातले सर्वात श्रीमंत राष्ट्र म्हणजे अमेरिकेत सर्वात अधिक आहे. अब्राहम लिंकन यांचा १५ एप्रिल १८६५ ला खून झाला. आजच्या अमेरिका राष्ट्राच्या निर्मितीचे ते एक जनक आहेत. हा खूनही वर्ण वर्चस्ववादानी भारलेल्या तरुणानेच केला होता. मार्टिन ल्यूथर किंग हे अमेरिकेतील मानवी हक्काच्या प्रमुख चळवळीचे शिल्पकार. ते कृष्णवर्णीय होते. अमेरिकेमधील कृष्णवर्णीयांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारांविरुद्ध ते लढत होते. १९६३ साली त्यांनी दिलेल्या एका गाजलेल्या भाषणामध्ये ते सांगतात;

"I have a dream that my four little children will one day live in a nation where they will not be judged by the colour of their skin but by the content of their character."

१९६५ साली त्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले होते. ४ एप्रिल १९६८ ला त्यांचा खून झाला. तोही एका वंशवादानी झपाटलेल्या युवकाकडून. या घटना इथेच थांबत नाहीत. स्वातंत्र्याच्या 'भन्नाट' कल्पनांमुळे अमेरिकेतील नागरिकाला स्वसंरक्षणाकरता आधुनिक बंदुक बाळगण्याचा अधिकार आहे. त्यांच्या मानवी अधिकारांचा तो एक भाग धरला जातो. शेकड्याने नोबेल पारितोषिकं मिळवलेल्या जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्राचा नागरिक हा धीरोदात्त, विचारशील आणि विवेकशीलच असणार! भारत, अफगाणिस्थान, इराक या देशांमधील जनता गरीब, अविकसित, सहाजिकच त्यांच्यामध्ये हे मानवी गुण कुठून येणार? प्रश्न सोडवण्याची किती साधी सुटसुटीत आणि वैज्ञानिक पद्धती ही!

इतक्या समृद्ध देशातला नागरिक हा स्वतःला एवढा असुरक्षित का समजतो हे सुद्धा एक मोठं कोडंच आहे. याच अमेरिकेमध्ये वैयक्तिक राग, लोभ, भांडण, तंटा या वादातून बंदुकीच्या गोळीबारांमुळे दरवर्षी काही शेकडो नागरिक बळी पडतात. त्याहीपेक्षा जास्त बळी हे वंशवादानी प्रेरीत होऊन अंदाधुंद गोळीबार केल्यामुळे होतात. यामध्ये शाळेमधील निरापराध मुलं, किंवा कृष्णवर्णिय अमेरिकन नागरिकांची संख्या, काही शेकड्यांनी आहे.

जगामधील दहशतवाद आणि मानवतावादाच्या भंगाच्या / उल्लंघनाच्या घटनांची जंत्री अमेरिकेतील अनेक स्वयंसेवी संघटना एक पवित्र कर्तव्य म्हणून दरवर्षी करत असतात. अर्थातच यामध्ये भारत, चीन, अफगाणिस्तान इत्यादी राष्ट्रांचा प्रामुख्याने संबंध असतो. बीबीसी, सीएनएनपासून न्यू यॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्टपर्यंतची सर्व माध्यमे रकानेच्या रकाने भरून त्यावर लिहीत असतात. आमच्याकडचे विशाल

(पृष्ठ क्र. ३९ वर)




विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष विसावे/अंक ३/मार्च २०१९**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | चाँगचिंग : डोंगरदऱ्यात वसलेले एक महाकाय शहर | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | आरोग्यवेध-०९ आरोग्याचा अर्थ | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | १९ व्या शतकातील पश्चिम भारतातील आद्यऋषी : बाळशास्त्री जांभेकर | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ९ |
| ५) | अर्थसंकल्प : वेगळे काहीतरी (पूर्वार्ध) | श्री. चन्द्रशेखर टिळक | १३ |
| ६) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १६ |
| ७) | ओळख वनस्पतींची - बारतोंडी | श्री. प्रकाश दुधाळकर | २० |
| ८) | एअर स्ट्राईकची रणनीती आणि परिणामांचा वेध | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | २१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २५ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# चाँगचिंग : डोंगरदऱ्यात वसलेले एक महाकाय शहर

*चीनमध्ये डोंगरदऱ्यात वसलेल्या 'चाँगचिंग' या शहराला भेट देऊन आलेले अनुभव या लेखात विशद केलेले आहेत.– संपादक*

दरवर्षी चीनमध्ये किशोरवयीन मुलांसाठी नवनिर्मिती स्पर्धा (China Adolescent Science and Technology Innovation Contest) आयोजित केली जाते. या स्पर्धेला थोडक्यात 'कास्टिक' असे म्हणतात. इसवी सन २००७ पासून कास्टिक स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळ नियमितपणे सहभागी होत आहे. ठाण्याच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील चार विद्यार्थी आपला विज्ञान प्रकल्प घेऊन या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जात असतात. या स्पर्धेचे आयोजन चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेच्या (China Association of Science and Technology) बाल आणि युवा विज्ञान केंद्राकडे (Children and Youth Science Centre) असते. या केंद्राकडून ऑगस्ट २०१८ मध्ये भरणाऱ्या ३३ व्या कास्टिक स्पर्धेसाठी विद्या प्रसारक मंडळाला निमंत्रण आले. ही स्पर्धा चाँगचिंग या शहरात भरणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. या शहराची आम्ही माहिती काढू लागलो. तसेच या शहरापर्यंत पोहोचायचे कसे याचीही माहिती आम्ही मिळवू लागलो. आमच्या असे लक्षात आले की, हे शहर चीनच्या दक्षिण पश्चिम भागात वसलेले आहे. या भागातच कुन्मिंग हे शहर आहे जिथे आम्ही २००७ साली गेलो होतो. त्यामुळे कुनमिंगवरून चाँगचिंगला जायचे असे आम्ही ठरविले. योगायोगाने कलकत्ता ते कुनमिंग अशी विमानसेवा असल्याचे आम्हाला कळले. म्हणून आम्ही तोच मार्ग निश्चित केला. प्रथम आम्ही मुंबईहून कलकत्त्याला गेलो, तिथून प्रथम कुनमिंगला आणि नंतर चाँगचिंगला पोहोचलो.



**३३ व्या कास्टिक स्पर्धेत सहभागी झालेली चमू**

तिथे जाण्यापूर्वी आम्ही शहराची जुजबी माहिती मिळविली होती. हे शहर खूप मोठे असून त्याची लोकसंख्या तीन कोटींच्या घरात असल्याचे कळले. परंतु शहराचे खरे स्वरूप विमानतळावरून हॉटेलकडे जाऊ लागल्यावरच लक्षात आले. हे शहर डोंगरदऱ्यात वसलेले असून विस्तीर्ण अशा परिसरात पसरलेले आहे. शहरात वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी सर्वत्र रूंद रस्ते बांधलेले आहेत. काही ठिकाणी अंतर करण्यासाठी डोंगरात बोगदे खोदलेले आहेत.



**बोगद्यातून जाणारा रस्ता**

यांग्ज़ी आणि जिआलिंग या दोन नद्यांच्या संगमावर

हे शहर वसलेले आहे. त्यामुळे नदीचे पात्र शहरात अनेक ठिकाणी आडवे येते. ते ओलांडण्यासाठी अनेक ठिकाणी पूल बांधले आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उत्तम आहे. बरेच लोक सार्वजनिक वाहनानेच प्रवास करतात. त्यामुळे मोजकीच खाजगी वाहने रस्त्यावर येतात. लोकसंख्या खूप असली तरीही शहरात गर्दी अशी जाणवतच नाही. रस्त्याच्या जोडीला शहरात एक सुसज्ज अशी मेट्रो आहे. त्या मार्गाने वाहतूक होते. एखाद्या व्यक्तीला पायी जायचे असेल तर तिच्यासाठी देखील उत्तम सोय आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुंदर झाडे लावलेली आहेत. त्यातून पायी चालणाऱ्यांसाठी पायवाट केलेली आहे.



**नदीवरील पूल**

आम्ही कास्टिक स्पर्धेत सहभागी होऊ लागलो तेव्हा मोजक्याच देशांचे प्रतिनिधी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येत असत. २००७ साली केवळ ९ देशांचे प्रतिनिधी होते. दरवर्षी या संखेत भर पडत गेली. २०१८ सालच्या स्पर्धेत एकूण ५० देश सहभागी झाले होते. स्पर्धकांची संख्या सुमारे ३०० एवढी होती. या सर्वांची एका मोठ्या हॉटेलात राहण्याची सोय केली होती. त्याचबरोबर स्पर्धेचे आयोजन एका महाकाय अशा आंतरराष्ट्रीय संमेलन संकुलात (International Convention Centre) केले होते. त्या ठिकाणी मोठमोठी दालने होती. या दालनात सर्व विद्यार्थ्यांनी आपापले प्रकल्प लावले.



**आंतरराष्ट्रीय संमेलन स्थळ**

स्पर्धेची सुरुवात एका दिमाखदार सोहळ्याने झाली. या सोहळ्यात प्रत्येक देशाचे प्रतिनिधी मंचावर येऊन आपल्या उपस्थितीची वर्दी देत. त्यानंतर काही प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. ही भाषणे चिनी भाषेतून दिली गेली. विदेशी पाहुण्यांना त्याचा मतितार्थ कळावा यासाठी प्रत्येकाला भाषांतर करणारे यंत्र दिलेले होते. या सोहळ्याला रंग आला तो तेथील शाळकरी मुलांमुलींनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने. औपचारिक उदघाटनानंतर एका वैचारिक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. एका चिनी गणितज्ज्ञाने चीनमधील गणिताची प्रगती आणि त्याचे अध्यापन या विषयावर उत्तम व्याखान दिले.




**उदघाटन सोहळा**

साधारणपणे सहा दशकांपूर्वी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा देशात विकास करण्याच्या उद्देशाने चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटना स्थापन करण्यात आली. अनेक

कुठल्याही फुलपात्रातील फुल स्मित करते; पण हसत मात्र कधीच नाही. – चेझल

शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ या संस्थेशी जोडले गेले. या संस्थेने देशाच्या विकासात मोलाची कामगिरी बजावली. या संस्थेचे सामाजिक कार्य देखील मोठे आहे. समाजात वैज्ञानिक जागृती करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यामधे विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी या संस्थेच्यावतीने विविध कार्यक्रम राबविले जातात. या सगळ्या कार्यक्रमांची माहिती देणारे प्रदर्शन एका दालनात भरविले होते. या दालनातून फेरफटका मारला की या संस्थेच्या कामाचा आवाका आपल्या लक्षात येतो. संस्थेने राबविलेल्या विविध कामांची माहिती या प्रदर्शनात चित्ररूपात दिलेली आहे. त्यातील एक बोलके चित्र खाली दिलेले आहे. एक वयस्कर शास्त्रज्ञ शाळकरी मुलांशी संवाद साधताना घेतलेले हे चित्र आहे. विज्ञानात संशोधन करण्याबरोबरच विज्ञानाचा प्रसार करणे आवश्यक आहे याची जाणीव येथील शास्त्रज्ञांना असल्याचे हे द्योतक आहे.



**वयोवृद्ध शास्त्रज्ञ शाळकरी मुलांशी गप्पा मारताना**

चाँगचिग हे शहर यांग्त्सी नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. या नदीवर शहरापासून जवळच एक महाकाय धरण बांधलले आहे. थ्री गोर्जेस धरण (Three Gorges Dam) असे त्याचे नाव असून ते जगातील सगळ्यात मोठे धरण म्हणून ओळखले जाते. या धरणातील पाण्याचा उपयोग करून वीज निर्मिती केली जाते. या धरणाचे काम करताना अनेक ठिकाणी खोदकाम करावे लागले. हे करीत असताना त्यांना अनेक महत्त्वाच्या वस्तू आढळल्या. त्या वस्तू एकत्र आणून थ्री गोर्जेस संग्रहालय (Three Gorges Museum) बनविण्यात आले आहे. या संग्रहालयाला भेट देण्याची आम्हाला संधी मिळाली. एका प्रशस्त अशा बहुमजली इमारतीत हे संग्रहालय आहे. या संग्रहालयाच्या भेटीवर एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल.




**थ्री गोर्जेस संग्रहालय**

चाँगचिंग हे एक औद्योगिक शहर आहे. येथे लॅपटॉप आणि रोबो मोठ्या संख्येने बनविले जातात. त्यापैकी रोबो बनविणाऱ्या कारखान्याला भेट देण्याची आम्हाला संधी मिळाली. त्यासाठी आम्हाला गावाच्या बाहेर असलेल्या एका औद्योगिक क्षेत्रात घेऊन गेले. विस्तीर्ण अशा परिसरात पसरलेल्या या औद्योगिक क्षेत्रात अनेक प्रकारचे कारखाने आहेत. त्यातील रोबोच्या कारखान्यासमोर आमची बस थांबली. या कारखान्याच्या पहिल्या मजल्यावर रोबोचे प्रदर्शन आहे. ते बघण्यासाठी



**आदेश पाळणारे रोबो**

आम्हाला वेळ देण्यात आला. तेथे बऱ्याच प्रकारचे रोबो ठेवलेले होते. ते बघता बघता वेळ कसा गेला

फुलांना मुलांची चमक असते आणि वृद्धांचे तोंड असते. - चेझल

हेच कळले नाही. परत निघण्याची सूचना जेव्हा स्वयंसेवकानी केली तेव्हा आम्ही भानावर आलो.

शहरात बघण्यासारखे बरेच काही आहे. परंतु एका ठिकाणी गेल्याशिवाय पर्यटन पूर्ण होत नाही. ते आहे जुने शहर. शहरात जशी कारखानदारी वाढली तशी आजूबाजूच्या गावातील अनेक कामगार या शहरात राहायला आले. त्यांच्या राहण्याची सोय करण्यासाठी नवनवीन इमारती बांधण्यात आल्या. हे करीत असताना त्यानी जुन्या वस्तीला हात लावला नाही. ती वस्ती अजुनही अस्तित्वात आहे. उलट या वस्तीचा, 'एक प्रेक्षणीय स्थळ' म्हणून त्यानी विकास केला. या वस्तीत अनेक नवनवीन दुकाने उभारली. त्यात स्थानिक स्तरावर तयार होण्याऱ्या वस्तू विक्रीला ठेवण्याची व्यवस्था केली. त्यामुळे चाँगचिंगला येणारे पर्यटक या परिसराला आवर्जून भेट देतात. कास्टिकच्या आयोजकानी देखील आम्हाला तिथे नेले होते. रस्ते अरूंद असून रस्त्याचा दोन्ही बाजूला दुकाने असल्यामुळे तेथे खूपच गर्दी असते. थोड्याच वेळात खरेदी आटोपून आम्ही बाहेर पडलो.



**जुन्या वस्तीतील बाजारातून फेरफटका**

कास्टिक स्पर्धेत सहभागी होण्याच्या निमित्ताने आम्ही चीनच्या अनेक शहरांत जाऊन आलो. परंतु चाँगचिंग हे एक वेगळेच शहर आहे. विशेष म्हणजे या शहराचा कारभार महापालिका चालविते. आपल्याकडे जसे केंद्रशासित शहरे आहेत तशीच चीनमध्ये सरळ केंद्राच्या अखत्यारित येणारी काही शहरे आहेत. त्यातील चाँगचिंग हे एक आहे. आमचा चाँगचिंगचा दौरा अनेक दृष्टीने फलदायी ठरला. कास्टिकच्या कालावधीतच या शहरात विज्ञान नवनिर्मिती शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी ठाण्याहून आणखी चार विद्यार्थी आमच्या सोबत आले होते. त्यांच्या अनुभवावर आधारित 'चाँगचिंगदौरा' या मथळ्याचा एक लेख दिशा मासिकाच्या आधीच्या अंकात आलेला आहे. कास्टिक सहभागाचा विचार करता असे म्हणता येईल की, पारितोषिकांची परंपरा आमच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीही कायम ठेवली. पारितोषिक समारंभात मिळालेली पदके अभिमानाने दाखविताना घेतलेले छायाचित्र खाली दिले आहे.



**पदक प्राप्त विद्यार्थी**

कास्टिकची ३४ वी स्पर्धा २० ते २६ जुलै २०१९ या कालावधीत मकाऊ (Macau) या शहरात आयोजित करण्यात आलेली आहे. दरवर्षीप्रमाणे या स्पर्धेचे निमंत्रण देखील विद्या प्रसारक मंडळाला मिळालेले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तयारी करण्यात येत आहे. त्याचा अहवाल पुढील लेखात.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

# आरोग्यवेध-०९ आरोग्याचा अर्थ

*‘आरोग्य’ या शब्दाचा, आपल्याकरता खरा अर्थ काय आहे आणि तो वास्तवात कसा आविष्कृत करावा ह्याविषयी मौलिक मार्गदर्शन या लेखात केले आहे.- संपादक*

७ एप्रिल हा जागतिक आरोग्यदिन म्हणून साजरा केला जात असतो. काय आहे आपल्याकरता ‘आरोग्याचा अर्थ’? डॉ.आनंद नाडकर्णी यांनी अनेक दशकांपूर्वी एक पुस्तक लिहिले होते, ज्याचे नाव होते ‘वैद्यकसत्ता’. आजच्या संपन्न जीवनात वैद्य म्हणजेच डॉक्टर अनभिषिक्त सत्ता गाजवू लागलेले दिसून येतात. तर आजच्या विपन्न जीवनात वैद्य म्हणजे डॉक्टर, औषधालाही सापडत नाही अशी अवस्था प्रत्यक्षात आहे.

डॉ. नाडकर्णींनी वैद्यकीय पाशातून माणसे कशी मेटाकुटीला येत आहेत त्यातून बाहेर कसे पडावे? ह्याचे सुबोध उपाय सांगितले होते. त्याच पुस्तकाच्या सुधारून वाढवलेल्या, अलीकडेच निघालेल्या आवृत्तीचे नाव आहे ‘आरोग्याचा अर्थ’. या पुस्तकात आरोग्य या शब्दाचा, आपल्याकरता खरा अर्थ काय आहे आणि तो वास्तवात कसा आविष्कृत करावा ह्याविषयी मौलिक मार्गदर्शन केले आहे.

त्यावेळी (अनेक दशकांपूर्वी) डॉक्टर अभय बंग यांनी महाराष्ट्रातील कुपोषणाचा अहवाल ‘कोवळी पानगळ’ या नावाने प्रसिद्ध केला होता. शहरी जीवनात अतिसेवनाने वैद्यकसत्तेच्या पाशात अडकलेले भारतीय, डॉ. नाडकर्णींनी अधोरेखित केले होते, तर दुसऱ्या बाजूस महाराष्ट्र कुपोषित बालकांच्या अपमृत्यूंनी गाजत होता. त्या विपन्नावस्थेतील बालकांना वैद्य सोडाच, पण साधे पोषणही मिळण्याची मारामार झालेली होती.

आज भारतातल्या शहरी जीवनात हृदयविकार, कर्करोग, मधुमेह इत्यादी वयपरत्वे येणाऱ्या अवनतीकारक रोगांचे प्रमाण वाढते आहे. एवढेच नव्हे तर हे रोग मनुष्याला अकालीच, अल्पवयातच गाठू लागलेले आहेत. माझ्या मित्राचा मुलगा वयाची साडेतीन वर्षे झाली असताना कर्करोगाने गेला. आमचे एक शेजारी वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी हृदयरोगाने निवर्तले. आजूबाजूस कायमस्वरूपी औषधी गोळ्या दररोज घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मी दररोज कुठलीही औषधी गोळी घेत नाही असे सांगणारा मनुष्यच दुर्मीळ होत चालला आहे. हे सगळे का होत आहे? काय आहेत ह्याची कारणे? त्यांचे निवारण कसे करता येईल? ह्या प्रश्नांमुळे अन्न गोड लागत नाही.

गावाकडली दिनचर्याच अशी होती की, सर्व शरीराचे सतत संचालन होत राही, करावेच लागत असे. पाणी आणण्याकरता असो, जळण जमा करण्याकरता असो, उपजीविकेकरता असो, माणसाला शारीरिकदृष्ट्या सतत सक्रीय राहावेच लागत असे. जसजसे लोक उपजीविकेपाठी शहरांत येऊ लागले तसतसे त्यांना शारीरिक संचालनातील स्वायत्ततेचा संकोच झाल्याचे जाणवू लागले. त्यांचे तासन्‌तास उभ्या व बैठ्या, तसेच अत्यंत अवघडलेल्या अवस्थेतीलही नित्य प्रवास सुरू झाले. दिनचर्या बैठी आणि शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय होत गेली. प्रतीक्षाकाळ आणि मानसिक तणाव वाढतच गेले. मोकळेपणाने हात-पाय ताणून आळस देणेही अवघड झाले. स्वच्छंदपणे हासणे असभ्य ठरले. मैदानी खेळ तर केवळ स्वप्न ठरू लागले. मुलाबाळांशी

---

सर्वसामान्य म्हणीपेक्षा कुठलीही गोष्ट व्यर्थ नाही. - मेकॉले

खेळण्यासही वेळ मिळेनासा झाला. लहान मुलांशी खेळण्यातला आनंद नाहीसा होऊन, बेबीसिटिंग हे दिव्य ठरू लागले.

एखादे यंत्र अमूक लाख वेळा काम करू शकते असे म्हटल्यावर, ते सिद्ध करण्याकरता त्या यंत्रास ताबडतोब, तितके लाख वेळा चालवून पाहतात. म्हणजे तो दावा खरा की खोटा ते सिद्ध होते. मात्र त्याकरता वर्षानुवर्षे थांबण्याची गरज राहत नाही. अशा चाचणीस, त्या यंत्राची त्वरित-आयुष्य-चाचणी (accelerated-life-test) असे संबोधले जाते. आजकाल जणू मानवी शरीरांची त्वरित-आयुष्य-चाचणीच होऊ लागली आहे. त्यामुळेच, वयपरत्वे वृद्धत्वी येणारे रोग माणसाला अल्पवयातच गाठू लागलेले दिसतात. म्हणूनच ह्यातून वाचण्याकरता काय करायला हवे आहे हेही उघड आणि स्पष्टच आहे.

आपल्या आजच्याच जीवनातील घटनांची गती आपल्याला शक्य असेल तितकी कमी करायची. शरीराचे जास्तीत जास्त स्वायत्त संचालन सतत करण्याचे प्रयास जारी ठेवायचे. अतिसेवनाने येणाऱ्या आजारांना प्रयत्नपूर्वक दूर ठेवायचे आणि मुलाबाळांशी खेळण्यात, आनंद मिळवण्यात धन्यता मानायची. दररोजच्या जीवनात मैदानी खेळ खेळण्याची संधी हुडकत राहायची. मिळेल तशी, तेव्हा ती साजरी करायची. हे तरी आपण करायलाच हवे आहे. शिवाय, आपल्याच शरीराची आपण त्वरित-आयुष्य-चाचणी घेत आहोत काय, याचे सतत परीक्षण करून, त्यातून आपले मार्ग आपणच काढायचे. हाच आपल्याकरता आज आरोग्यरक्षणाचा किमान अर्थ आहे.

रोजच्याच जीवनात, काय वेगळे करावे म्हणजे अवनती टाळता येईल? हाच खरा प्रश्न असतो. त्याकरता खालील पाच कलमी धोरण कुणीही अवलंबू शकेल असेच आहे. सर्दीपडशाकरता औषध घेणे टाळणेच उचित आहे. दिनचर्येतील, आहारातील बदलाने ते साधता आल्यास पाहावे, हे उचित आहे. बघू या काय काय जमते ते. मात्र मी खालील वाक्ये रोज म्हणू शकलो, तर मला अभिमान वाटेल आणि आरोग्यरक्षणही नक्कीच साधेल!

१. मी दररोज कुठलीही औषधी गोळी घेत नाही,

२. मी दररोज कुठलातरी मैदानी खेळ खेळतो,

३. मी साखर, मीठ, तेल, तूप यांसारख्या मानवनिर्मित संहत पदार्थांचे सेवन घटवत असतो,

४. मी बैठ्या, नेत्रावलंबी कामात व्यग्र असता, तासातासाला पाच-पाच मिनिटे अवस्थांतर करतो,

५. मी दररोज सृजनात्मक, इतरांना आनंद देईल असे एक तरी काम करतो.

तेव्हा जीवनशैली परिवर्तन तर हवेच. मात्र ते कसे असावे ह्याबाबतची ही पाच प्राथमिक उद्दिष्टे आहेत. मला सांगा तुम्हाला ही उद्दिष्टे पटतात का? पटत असतील तर ती साधण्याकरता तुम्ही काय करू इच्छिता? करता? इतरांनी ती साधण्याकरता काय काय उपाय अवलंबावेत? असे केले तर आपल्या सगळ्यांच्या प्रयासांतूनच आपल्याला माहिती युगातील आरोग्याचा खरा अर्थ कळू लागेल. आरोग्य कमावता येईल आणि सांभाळताही येईल!

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

'उदाहरणार्थ' हा सिद्धान्त नव्हे. - यहुदी म्हण

# १९ व्या शतकातील पश्चिम भारतातील आद्यऋषी : बाळशास्त्री जांभेकर
## (भाग :२)

*१९ व्या शतकातील आद्य समाजसुधारक व पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्याविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

बाळशास्त्रींना 'मराठी वृत्तपत्रकारितेचे जनक' असे म्हटले जाते कारण त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या पाक्षिकाची सुरुवात केली. या पत्राचे नाव त्यांनी 'दर्पण' ठेवले यावरूनच त्यांचे हे पत्र सुरू करण्यामागची भूमिका लक्षात येते. 'दर्पण' म्हणजे आरसा व बाळशास्त्रींना याची पूर्णतः जाणीव होती की, वृत्तपत्र म्हणजे समाजाचा आरसा असावा, याचाच अर्थ त्यांना आपल्या वृत्तपत्रात समाजाचे प्रतिबिंब उमटवायचे होते, नव्हे त्यांना समाजसुधारणा करून 'दर्पणा'त समाजाचे चांगले प्रतिबिंब उमटवायचे होते असे म्हणणे वावगे ठरू नये. बाळशास्त्रींनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याचे मोठे कार्य केले. त्यांनी समाजामध्ये ज्ञानाचा प्रसार व अभिसरण होण्यासाठी आपल्या 'दर्पण' या पत्राचा मोठ्या खुबीने वापर केला. देशाचा व समाजाचा उद्धार विविध बाबींकडे वैज्ञानिक व बुद्धी प्रामाण्यवादी दृष्टीकोनातून पाहिल्यावरच होईल असे त्यांचे विचार होते.

समाजामध्ये ज्ञानाच्या प्रसारासाठी ग्रंथालये फार महत्त्वाची भूमिका बजावतात हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळेच बाळशास्त्रींचा सार्वजनिक ग्रंथालये उभारण्यावर भर होता. त्यांनी 'बॉम्बे नेटीव्ह जनरल लायब्ररी' या ग्रंथालयाची स्थापना केली होती. त्यांनी 'नेटीव्ह इंप्रूव्हमेंट सोसायटी' या संस्थेची देखील स्थापना केली होती. नंतरच्या काळात बाळशास्त्रींचे दोन शिष्य दादाभाई नौरोजी व डॉ. भाऊ दाजी लाड यांनी 'स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' या मुंबईतील नामांकित संस्थेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. दादाभाईंचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ रोजी मुंबईत झाला. ते पारशी समाजाचे होते. त्यांनी सुरुवातीपासूनच आधुनिक इंग्रजी शिक्षण व समाज सुधारणेचा पुरस्कार केल्याचे निदर्शनास येते. मुंबईमध्ये १९ व्या शतकात मुलींची शाळा काढण्यामध्ये देखील दादाभाईंनी पुढाकार घेतला होता. त्यांनी आपल्या विचारांचा व समाज सुधारणेचा पुरस्कार व प्रचार करण्यासाठी 'रास्त गोप्त्थार' हे पत्रदेखील सुरू केले होते. हे पत्र इंग्रजी तसेच गुजराथी या भाषांमध्ये मुंबईतून प्रसिद्ध होत असे. दादाभाई नौरोजींनी ब्रिटिशांच्या जाचक व चुकीच्या आर्थिक धोरणांविरुद्ध समाजामध्ये जागरुकता निर्माण करण्याचे मोठे कार्य केले. त्यांनी आपल्या 'पॉव्हर्टी अँड ब्रिटिश अनरग्ल इन इंडिया' या पुस्तकात आपल्या जग प्रसिद्ध 'ड्रेन थिअरी'चा सिद्धांत मांडला होता. या सिद्धांतानुसार त्यांनी ब्रिटिश कशाप्रकारे भारताचे आर्थिक शोषण करत आहेत व भारताच्या संपत्तीची लूट करताहेत हे पुराव्यांसह सिद्ध केले होते. दादाभाई नौरोजींनी ब्रिटिशकालीन अर्थव्यवस्थेवर जे अभ्यासपूर्ण भाष्य केले त्यामुळे भारतात आर्थिक राष्ट्रवादाचा प्रसार होण्यास मदत झाली यात वाद नाही. दादाभाईंना आर्थिक राष्ट्रवादाविषयीची प्रेरणा कुठून मिळाली याचे चांगले विवेचन महाराष्ट्रातील प्रसिद्ध इतिहासकार प्रा. जे. व्ही. नाईक यांनी आपल्या 'फोररनर्स ऑफ दादाभाई नौरोजीज् ड्रेन थिअरी' या शोध निबंधांत अतिशय छानपणे केले आहे. सदर शोधनिबंध 'इकॉनॉमिक अँड पोलीटिकल विकली' या नियतकालिकात नोव्हेंबर

२००१ सालच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. वाचकांनी हा लेख जरूर वाचावा. सदर लेख 'जेस्टोर' (ऑनलाईन माहितीसंग्रहामध्ये उपलब्ध आहे) इंग्लंडमध्ये जाऊन तेथील जनतेला व शासनाला भारतातील वस्तुस्थितीबाबत माहिती दिल्यास भारतामध्ये राजकीय सुधारणा निश्चितपणे घडवून आणता येतील असे दादाभाई नौरोजींना वाटत होते. तसेच ब्रिटिशांना त्यांचे भारतविषयक आर्थिक धोरण बदलण्यास देखील भाग पाडता येईल अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी इंगलंडमध्ये राहून ब्रिटिश जनतेला भारतातील खरे चित्र दाखवून देण्याचा प्रयत्न केला. ते इंग्लंडच्या संसदेच्या कनिष्ठ दालनाचे म्हणजेच हाऊस ऑफ कॉमन्सचे देखील सदस्य झाले होते. दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सोबत देखील जोडलेले होते. १९०६ सालच्या काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. (दादाभाई एकंदरीत तीन वेळा काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते. ही तीन अधिवेशने पुढीलप्रमाणे होत – कलकत्ता अधिवेशन – १८८६, लाहोर अधिवेशन – १८९३ व कलकत्ता अधिवेशन –१९०६). १९०७ सालचे काँग्रेसचे अधिवेशन गुजरातमधील सुरत येथे भरले होते व हे अधिवेशन अतिशय वादळी ठरले होते. याचे कारण असे की, या अधिवेशनादरम्यानच काँग्रेसमधील मवाळ व जहाल गटामध्ये फूट पडली होती. असो.

बाळशास्त्रींचे अजून एक प्रसिद्ध शिष्य म्हणजे डॉ. भाऊ दाजी लाड हे होत. यांचे मूळ नाव रामचंद्र विठ्ठल लाड असे होते. ते वत्सगोत्री सारस्वत ब्राह्मण होते. त्यांचे मूळगाव गोव्यातील पेडणे तालुक्यातील पार्से हे होय. त्यांचे वडील रामचंद्र लाड हे १८३३ मध्ये मुंबईला आले. त्यांनी १८५१ साली मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय पदवी संपादन केली. त्यांनी वैद्यकीय सेवेसोबतच जनसेवेचा वसा घेतला होता. ते धन्वंतरी म्हणून देखील प्रसिद्ध होते. त्यांनी समाजामध्ये देवीची लस लोकप्रिय करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले होते. तसेच त्यांनी गरिबांसाठी एक धर्मादाय दवाखानादेखील सुरू केला होता. डॉ. भाऊ दाजी लाड यांनी सततपणे विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केलेला होता. ते पुनर्विवाहोत्तेजक मंडळाचे सदस्य होते. वेणुबाई व कुवर या दोन विधवांच्या पुनर्विवाहाच्या वेळी ते स्वतः हजर होते. त्यांनी समाजामध्ये पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार व प्रचार केला. त्यांनी स्त्री शिक्षणाचा देखील पुरस्कार केला. मुंबईतील स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक असोसिएशनच्या मुंबईतील लोहार चाळीतील कन्याशाळेला डॉ. भाऊ लाडांनी रुपये १६,५०० एवढी देणगी दिली होती. नंतरच्या काळात या शाळेला 'भाऊ दाजी गर्लस् स्कूल' हे नाव देण्यात आले. डॉ. भाऊ दाजी या संस्थेचे अनेक वर्ष अध्यक्ष होते. त्यांनी १८५३ मध्ये ब्रिटिश संसदेला पत्रामार्फत दारू, अफू, गांजा इत्यादी मादक पदार्थांच्या उत्पादनावर व सेवनावर बंदी आणावी अशी मागणी केली होती. त्यांनी नाट्य कलेला देखील प्रोत्साहन दिले. डॉ. भाऊ दाजी हे इतिहास संशोधक व पुराणेतिहासाचे अभ्यासक होते. त्यांनी कालिदासाचा कालनिर्णय, शकांचे हल्ले, जैन धर्माची परंपरा आदी विषयांवर संशोधनपर पुस्तकांचे लिखाण केले होते. त्यांनी इतिहास संशोधनासाठी भारतभर प्रवास केला होता. ते मुंबईतील रॉयल एशियाटिक सोसायटीचे सभासद होते. अशाप्रकारे डॉ. भाऊ दाजी लाड हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते व बाळशास्त्री हे त्यांचे गुरू होते. असो.

आपण पाहिलेलेच आहे की, बाळशास्त्री हे कऱ्हाडे ब्राह्मण होते व त्यांचे पूर्वज कोकणात शिलहार राजघराण्याचे राज्य असताना कोकणात स्थलांतरीत झाले होते. बाळशास्त्रींचे पूर्वज गोमंतकात देखील गेले होते असे दाखले सापडतात. बाळशास्त्रींच्या मोठ्या बंधुंचे नाव नारायणशास्त्री होते व त्यांच्या बहिणींची

नावे लाडूबाई व चिमाबाई अशी होती. लाडूबाईंच्या यममानाचं नाव रामशास्त्री जानवेकर असे होते. हे रामशास्त्री सावंतवाडीचे होते. रामशास्त्रींमुळेच बाळशास्त्री मुंबईला आले व त्यांची त्यांच्या बहिणीच्या घरी राहण्याची सोय झाली.

बाळशास्त्रींनी बालविवाह, पुनर्विवाह व सती प्रथांबद्दल महाराष्ट्रात सर्वप्रथम लिखाण करून या अनिष्ट प्रथांना विरोध केला. त्यांनी स्त्रीशिक्षणाचा देखील हिरीरीने पुरस्कार केला. त्यांनी धर्मांतरितांचे शुद्धीकरण करून त्यांना स्वधर्मात म्हणजेच हिंदू धर्मात परत घेण्याचे कार्य केले. त्यांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हिंदूचे धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रयत्नांना प्रखर विरोध केला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्याकाळात गाजलेले शेषाद्री प्रकरण होय. बाळशास्त्रींनी मुंबई सुप्रीम कोर्टात म्हणजेच सध्याचे मुंबई उच्च न्यायालयात जाऊन श्रीपत शेषाद्री या देशस्थ ब्राह्मण मुलाला रेव्हरंड रॉबर्ट नेज्‌बिट याच्या कचाट्यातून सोडवून त्याला ख्रिस्ती होण्यापासून वाचवले. यात बाळशास्त्रींना मुंबईतील बडी आसामी व समाज सुधारक नाना जगन्नाथ शंकरशेठ यांनीदेखील मदत केली होती. शेषाद्री हे कुटुंब मूळचे तत्कालीन निजाम राज्यातील म्हणजेच सध्याच्या महाराष्ट्रातील मराठवाड्यातील ‘परळी’ (जिल्हा बीड) येथील होते.

बाळशास्त्रींना भारतातील आद्य समाजसुधारक व आधुनिक भारताचे प्रणेते राजा राममोहन रॉय यांच्यापासून प्रेरणा मिळाली होती असे काही अभ्यासकांचे मत आहे. त्यांच्या कार्याचा आवाका पाहून गव्हर्नर सर जेम्स कर्नाक यांनी त्यांना १८४० साली ‘जस्टीस ऑफ पीस’ ही पदवी दिली व न्यायमूर्ती चंदावरकरांनी त्यांचा उल्लेख ‘पश्चिम भारतातील आद्यऋषी’, तर दादाभाई नौरोजींनी त्यांना ‘अद्वितीय विद्वान’ व ‘प्रख्यात पंडित’ असे संबोधल्याचे लक्षात येते.

बाळशास्त्रींना गणित, भूगोल इत्यादी विषयांचे अघाद ज्ञान होते. त्याचप्रमाणे त्यांचा मराठी भाषेच्या व्याकरणाचादेखील दांडगा अभ्यास होता. मराठी भाषेच्या व्याकरणावरील बाळशास्त्रींचे ‘बाल व्याकरण’ हे पुस्तक प्रकाशित झालेले होते. या पुस्तकात बाळशास्त्रींनी मराठी भाषेचे व्याकरण विषयक नियम शाळकरी मुलांनासुद्धा सहजतेने कळतील अशा प्रकारे मांडणी केली होती. बाळशास्त्रींना ‘ज्ञानेश्वरी’ची मराठीतील पहिली छापील प्रत तयार करण्याचे श्रेय जाते.

बाळशास्त्रींचा मुंबईतील अनेक मान्यता प्रत संस्थांसोबत संबंध होता. अशाच एका संस्थेपैकी एक म्हणजे मुंबईतील रॉयल एशियाटिक सोसायटी होय. या संस्थेच्या पौर्वात्य भाषांचे भाषांतर करण्यासाठी असणाऱ्या समितीवर बाळशास्त्री सदस्य होते. या समितीतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या पत्रिकेच्या अनेक अंकांमध्ये त्यांनी संशोधनपर लेख लिहिले होते. या लेखांचा विषय कोकणातील शिलालेख, ताम्रपट व एकंदरीतच इतिहास हा असे. यावरून बाळशास्त्री एक इतिहास संशोधक होते व त्यांचे कोकणाच्या इतिहासावरील संशोधन फार महत्त्वाचे होते यात वाद नाही. त्यामुळेच नीला उपाध्ये यांनी आपल्या ‘युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर : काळ आणि कर्तृत्व’ या पुस्तकात बाळशास्त्रींचा उल्लेख ‘भारतीय इतिहास संशोधनाचे जनक’ असा केला आहे. आज आपणास आपल्या राज्यात म्हणजेच महाराष्ट्रात अनेक ग्रंथालये / वाचनालये असल्याचे निदर्शनास येते. याचे श्रेय कुठेतरी बाळशास्त्रींना जाते यात वाद नाही. कारण ज्ञानाची कवाडे जनसामान्यपर्यंत उघडी करण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांची गरज असते, हे बाळशास्त्रींनी ओळखले होते. यातूनच १८४५ साली ‘बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररी’ या वाचनालयाची स्थापना झाली. बाळशास्त्रींनी ‘नेटिव्ह इम्प्रूव्हमेंट सोसायटी’ या संस्थेची देखील स्थापना केली होती. या संस्थेचे प्रमुख

---

जे माझा नाश करत नाही, ते मला जास्त बलवान करते. – नित्शे

उद्दीष्ट जनतेच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या विविध मुद्यांवर चर्चा करणे, संवाद करणे व या विषयाशी संबंधीत निबंध लिहून त्यांचे वाचन करणे असे होते. या उपक्रमात बाळशास्त्रींचे अनेक शिष्य सहभागी होत असत. बाळशास्त्रींच्या शिष्यांत दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलिक आदींचा समावेश होतो. बाळशास्त्रींच्या या शिष्यांनीच पुढे चालून 'स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेने लोकशिक्षण व लोकसुधारणेचा वसा घेतला होता. आपण येथे एशियाटिक सोसायटी ऑफ बाँबेचा उल्लेख केला, या संस्थेप्रमाणेच बाळशास्त्रींचा मुंबईतील अजून एका महत्त्वाच्या संस्थेशी फार जवळचा संबंध होता व ही संस्था म्हणजे 'जिऑग्राफिकल सोसायटी' ही होय.

आपण पाहिलेलेच आहे की, बाळशास्त्रींची आद्य ओळख 'दर्पणकार' म्हणजेच पत्रकार बाळशास्त्री जांभेकर अशी आहे. परंतु असे असले तरी, आपण पाहिले की, बाळशास्त्रींनी अनेक क्षेत्रांमध्ये व विषयांमध्ये भरीव योगदान दिले होते. यात गणित, भूगोल, इतिहास, मराठी, व्याकरण, समाजसुधारणा इत्यादींचा समावेश होतो. अशा बहुआयामी व अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेच्या तज्ज्ञाचे नव्हे, ऋषीचे देहावासन दिनांक १७ मे १८४६ रोजी वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी झाले. बाळशास्त्रींचे जेव्हा निधन झाले तेव्हा त्यांची पत्नी सुंदराबाई गरोदर होती. निधनसमयी बाळशास्त्री कर्जबाजारी झालेले होते ही अतिशय खेदाची आहे. कारण, ज्या व्यक्तींने आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या हिताला वाहून घेतले होते त्याचे निधन विपन्नावस्थेत झाले व याच्या झळा त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांनाही बसल्या. बाळशास्त्रींचे आधुनिक महाराष्ट्राच्या निर्माणात अनन्यसाधारण योगदान आहे यात वाद नाही. ६ जानेवारी २०१९ या दिवशी 'दर्पण' सुरु झाले. त्यास १८७ वर्ष पूर्ण झाली. तसेच काही अभ्यासकांना असे वाटते की, ६ जानेवारी १८१२ हा बाळशास्त्रींचा जन्मदिवस असावा. त्यामुळे ६ जानेवारी २०१९ या दिवशी बाळशास्त्रींची २०७ वी जयंती होती. तसेच दरवर्षी ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे वा या सर्व योगायोगामुळे दिशाच्या या अंकात बाळशास्त्रींच्या कार्याची माहिती आजच्या युवा पिढीला थोडक्यात करून देण्याचा हा प्रयत्न आहे. बाळशास्त्रींना समस्त 'दिशा' परिवारातर्फे त्रिवार अभिवादन.

**संदर्भ**


- युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर : काळ आणि कर्तृत्वः नीला उपाध्ये
- आचार्य बाळशास्त्री जांभेकर : व्ही. ए. पाटील
- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास : डॉ. अनिल कठारे
- नाईन्टींथ सेंच्युरि हिस्ट्री ऑफ महाराष्ट्र (खंड १ व खंड २) : बी. आर. सुनथनकर
- अ न्यू लूक ॲट मॉडर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल. गोव्हर, अलका मेहता



**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


•••


***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# अर्थसंकल्प : वेगळे काहीतरी
## (पूर्वार्ध)

*अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय? याविषयीची माहिती या लेखात दिली आहे- संपादक*

आपल्यासहीत मलाही माहिती आहे की, केंद्रीय अर्थसंकल्प सादर होऊन आता एक महिना उलटून गेला आहे. त्यामुळे या विषयावर आता काही लिहिणे हे पार शिळे - पाके होईल. पण मी हे मुद्दामहून करत आहे. कारण त्याबाबतचा राजकीय - सामाजिक गदारोळ शमण्याची आवश्यकता होती. असो.

खरं म्हणजे, १ फेब्रुवारी २०१९ रोजी आपल्या संसदेत सादर झालेला अर्थसंकल्प हा अंतरिम सरकारचा, अंतरिम अर्थमंत्र्यांनी, अंतरिम अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केन्द्र सरकारला जेमतेम ५०-५५ दिवस मिळतील अशा अर्थानी अंतरिम सरकार. हा अर्थसंकल्प सादर करताना मा. श्री. पियुष गोयल यांच्याकडे अर्थखात्याचा तात्पुरता कार्यभार होता अशा अर्थानी अंतरिम अर्थमंत्री. हा अर्थसंकल्प सादर करताना झालेल्या अर्थसंकल्पीय भाषणाचे पहिलेच वाक्य मुळी I rise to present Interim Budget.... असे आहे. अशा अर्थाने हा अंतरिम अर्थसंकल्प.

जानेवारी महिन्यात मला एकाने विचारले होते की, अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय ?

हा प्रश्न फारसा सरळपणे विचारलेला नव्हता. त्यामुळे मी गंमतीने असे म्हटले होते की, 'करायचे काही नाही आणि सांगायचे सोडायचे नाही' असा अर्थसंकल्प म्हणजे अंतरिम अर्थसंकल्प.

हे उत्तर म्हणजे निव्वळ फाजीलपणा होता असे मात्र नाही. कारण हा अर्थसंकल्प हा काही स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासात सादर झालेला पहिला अंतरिम अर्थसंकल्प नाही. आजपर्यंतच्या अंतरिम अर्थसंकल्पांचा अनुभव असाच असल्यामुळे मी तसं म्हटलं होते. पण ....

अगदी देवकीताई पंडित यांच्या 'पण' सारखे ....

१ फेब्रुवारी २०१९ रोजी तत्कालीन तात्पुरते अर्थमंत्री मा. श्री. पियुष गोयल यांनी आपल्या संसदेला सादर केलेला अर्थसंकल्प हा या इतिहासाला छेद देणारा आहे.

हा अर्थसंकल्प आहे अंतरिमच.

केवळ तसा उल्लेख या अर्थसंकल्पीय भाषणात एकापेक्षा जास्त वेळा म्हणून नव्हे ....आगामी धोरणाची दिशा दाखवत असतानाही त्याचे तपशील देण्यापासून स्वतःला रोखणारा असा हा अर्थसंकल्प आहे ...

'पुढे सरते, फिरते' अशा धाटणीचा.

पण नववधू नसलेले. न लाजणारे.

आधीच्या जमान्यातले एक सुप्रसिद्ध हिंदुस्तानी शास्त्रीय गायक त्यांच्या उतारवयात रागविस्तार एका विशिष्ट टप्प्यापर्यन्त करत असतं आणि नंतर पुढचा टप्पा बोटांनी दाखवत असतं असं म्हणतात.

हा अर्थसंकल्प बराचसा तसा आहे.

(सरकारची या कालखंडातली मुदत संपत आली आहे अशा अर्थाने 'वृद्ध' घ्यावे ही विनंती .... उगा गदारोळ नको.)

ज्यांना कमीत कमी समजते ते आज्ञापालनाचे काम जास्तीत जास्त करतात. - फरकुहार

पण जर राजकीय रंगसंगती बाजूला ठेवून निखळ अर्थकारण आणि समंजस समाजकारण याचा विचार करायचा झाला तर हा अर्थसंकल्प फार वेगळा ठरू शकतो. नव्हे; ठरतो.

स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातला हा पहिला अर्थसंकल्प (आणि तोही अंतरिम अर्थसंकल्प) असेल की ज्यात 'तेल' या शब्दाचा उल्लेख नाही. आपण देश म्हणून तेलाबाबत स्वयंपूर्ण झालो आहोत असा त्याचा जरासुद्धा अर्थ नाही. पण याचा एक अर्थ नक्कीच असा असू शकतो कीं गेल्या काही वर्षातील धोरणांमुळे, प्रयत्नांमुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणून, एक देश म्हणून आपण आता जागतिक तेल बाजारात अगतिक नाही. काही तेल – उत्पादक देश अमेरिकी दबाव झुगारून देत आपल्या देशाला तेल – पुरवठा करायला तयार असतात याचे हे द्योतक आहे. इतकेच नव्हे तर, एक तेल निर्यातदार देश पाण्याच्या बदल्यात, तर दुसरा देश तांदूळ घेऊन आपल्या देशाला तेल पुरवण्यास तयार आहे याचे हे सूतोवाच आहे. येणाऱ्या काळात या दिशेने प्रयत्न सुरू ठेवल्यास आधीची परिस्थिती हळूहळू का होईना पण सुधारू शकते हे न बोलता सांगणारा हा अर्थसंकल्प आहे. हे दोन देश अशी तयारी दर्शवत असताना जागतिक चलन – बाजारात झालेल्या घडामोडी हा तर स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

या अर्थसंकल्पात जसा 'तेल' या शब्दाचा उल्लेख नाही; तसा 'अनुदान' या शब्दाचा उल्लेख नाही. उल्लेख आहे तो 'सन्मान–निधी' या शब्दाचा. युनिव्हर्सल बेसिक इनकम कडे ही वाटचाल असू शकते का, हे तर येणारा काळच ठरवू शकतो.

या अंतरिम अर्थसंकल्पात जसा तेल आणि अनुदान या शब्दांचा उल्लेख नाही; तसाच या अर्थसंकल्पात 'सोनं' या शब्दाचाही उल्लेख नाही. गेल्या काही वर्षात आपल्या देशातील सोन्याच्या खरेदीचे, आणि त्यामुळे आयातीचे प्रमाण कमी – कमी होतं जातं आहे. यांत निश्चलनिकरणाचा किती हातभार आहे हा कदाचित राजकीय धुमश्चक्रीचा विषय होईल. पण बदलत्या अर्थकारणाची ती पोचपावती आहे हे नक्कीच !

तेल, सोने आणि अनुदान या तीन गोष्टी वर्षानुवर्षे कशा आणि किती प्रमाणात आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला वेठीस धरायच्या हे सर्वद्न्यात आहे. पण या परिस्थितीत बदल होतं आहे हे तसं न बोलता सांगणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

जर या वर उल्लेख केलेल्या तीन गोष्टींचा उल्लेख नसणे हे एक वेगळेपण असेल (आणि ते तसं वेगळेपण आहेच); तर काही गोष्टींचा असणारा उल्लेख हेही या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य आहे.

असा एक शब्द म्हणजे मध्यम–वर्ग (आपल्या नेहमीच्या मराठीत सांगायचे तर मिडिल – क्लास .)

हा शब्द यावेळच्या अर्थसंकल्पीय भाषणात एकापेक्षा जास्त वेळा आला आहे हे वेगळेपणच नव्हे तर वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण अर्थसंकल्पीय भाषणाला या शब्दाचे वावडे आहे. अगदी ॲलर्जी आहे असं म्हणावं इतके...

आधीच्या पिढीतील नामवंत अर्थतज्ज्ञ मा. श्री. वि. म. कुलकर्णी तर म्हणत असतं की, 'अर्थशास्त्रात मध्यमवर्ग असं काही नसतंच. श्रीमंतवर्ग ज्यांना आपले मानत नाही; आणि ज्या वर्गाला गरीब आपले वाटतं नाहीत असा वर्ग म्हणजे मध्यम – वर्ग.'

आता जर असा वर्ग नसतोच असं मानलं जातं असेल (आर्थिक – राजकीय – सामाजिक दृष्ट्या इतके ज्याला गृहीत धरलं जातं अशा अर्थाने ) तर ते धोरणात कुटून आणि कसे येणार ? ....

काहीवेळा या वर्गासाठी या ना त्या स्वरूपात, या ना त्या प्रमाणात काही जरूर केले गेले; पण मध्यम – वर्ग या शब्दाचा स्पष्टपणे केला गेला नव्हता असा उल्लेख

या अर्थसंकल्पात येतो हे वैशिष्ट्यपूर्ण निश्चितच आहे.

(आता आणि आत्ताच तसा उल्लेख का यावा यावर एक स्वतंत्र राजकीय टिप्पणी नक्कीच करता येईल. पण तो या लेखाचा विषय नाही.)

पण राष्ट्रीय अर्थकारणात आर्थिक निकषांवर या वर्गाचे स्थान यापुढे नाकारता येणार नाही याची धोरणात्मक कबुली म्हणजे या अर्थसंकल्पात एकापेक्षा जास्त वेळा आलेला 'मध्यम-वर्ग' शब्दाचा उल्लेख. १९९१ सालापासून आपल्या देशात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम सुरू झाला तेंव्हापासून गेल्या २८ -२९ वर्षात अनेक राजकीय रंगसंगतीची सरकारे आपल्या देशाने पाहिली. पण कधीही आपल्या राष्ट्रीय आर्थिक धोरणाने घूमजाव (यू टर्न अशा अर्थाने) केलेले नाही. काहीवेळा प्राधान्य - क्रमात बदल झाला असेल, कधी योजनांना दिल्या जाणाऱ्या नामाविधानात बदल झाला असेलही, पण सर्वसाधारण दिशा बदललेली नाही. त्यातून अर्थकारणात 'पी हळद, हो गोरी' हे जसं स्पष्ट होत गेलं; तसंच आणि तितकेच मध्यमवर्गाचा राष्ट्रीय अर्थकारणात दुर्लक्ष न करण्याइतका झालेला उदय हे वास्तव झाले. मोदी सरकारच्या 'मेक इन इंडिया, स्टार्ट - अप इंडिया, स्टँड -अप इंडिया' या योजनांतून यांत वाढच होईल.

हे वास्तव आणि भविष्य अधिकृतपणे शब्दबद्ध आणि कृतिमान्य करणारा असा हा अर्थसंकल्प आहे . एका अर्थाने आर्थिक - सामाजिक - राजकीय दृष्ट्या राष्ट्रीय अर्थकारणाची सूत्रे एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे गेल्याचे अधोरेखित करणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

मुळातच हे या अर्थसंकल्पाचे आगळे - वेगळे वैशिष्ट्य आहेच.

पण ते तेवढ्या पुरते मर्यादित नाही.

या अर्थसंकल्पात लक्ष दिलेल्या दोन गोष्टीही जरूर विचार करण्याजोग्या आहेत.

यांपैकी पहिली गोष्ट म्हणजे जल - प्रवास ...Blue Economy. कलकत्याहून वाराणसीला समुद्र आणि नदीतून एक जहाज (एरवी १२० कंटेनर लागतील एवढा) माल घेऊन पोचते ही केवळ नांदी होती; असा भर या अर्थसंकल्पात जल - वाहतुकीवर आहे.

ऑफीसच्या कामामुळे गेली आठ वर्षे माझे नियमितपणे वाराणसीला जाणे होते. त्या अनुभवातून मी इतके नक्कीच म्हणू शकतो की, स्वतःचा लोकसभा मतदारसंघ म्हणून पंतप्रधान नरेन्द्र मोदीनी वाराणसीची निवड करणे आणि अशी जलवाहतूक सुरू करताना वाराणसी हे त्याचे गंतव्य स्थान असणे या दोन निर्णयातल्या कोणत्या निर्णयाने वाराणसीचे अर्थकारण जास्त प्रभावीपणे बदलले किंवा बदलेल हे सांगणे किंवा ठरवणे सोपे नाही. हे फार सांकेतिक आणि सूचक आहे. देशाच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता असणारे हे पाऊल आहे. विविध राज्य सरकारांनी त्यांच्या त्यांच्या राज्यीय अर्थसंकल्पातून अशा स्वरूपाच्या योजनांचा पुरस्कार आणि पाठपुरावा केला तर वाहतूक, रोजगार, पर्यटन, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांना अच्छे दिन येऊ शकतात. असे आणि हे दार उघडणारा हा अर्थसंकल्प आहे.

जल-वाहतूक क्षेत्र जसं या अर्थसंकल्पात प्रामुख्याने येते; तसंच आणि तितकेच या अर्थसंकल्पात येणारे दुसरे क्षेत्र म्हणजे अवकाश आणि उपग्रह व अवकाश-यान उड्डाण.

२६ मे २०१४ रोजी मोदी सरकार सत्तारूढ झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत पंतप्रधान मा. श्री. नरेन्द्र मोदी यांनी श्रीहरीकोटा येथील केंद्राला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी तिथल्या सुविधांचा उपयोग सार्क देशांसह इतरांना करून देता येईल का असा विचार मांडला होता. तेंव्हापासून गेल्या काही वर्षांत आपल्या

(पृष्ठ क्र.१९वर)

जो कृती न करता इच्छा धरतो, तो महामारीचा रोग स्वतःवर ओढवून घेत असतो. - ब्लेक

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था
## (भाग-१)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' या इंग्रजी लघुशोध निबंधाचे मधुकर गजानन दातार यांनी केलेले मराठी भाषांतर - संपादक*

**प्रस्तावना**

**हा शोधनिबंध लिहिण्यामागचा मूळ उद्देश**

पुरातन काळापासून सर्वसामान्य जनता अन्न-वस्त्र-निवारा शोधण्यासाठी किंवा सध्या उपलब्ध आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या सोयी मिळाव्यात या हेतूने शोध घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी हिंडत असे. या संदर्भात विशेषतः 'वाहतुक आणि परिवहन' या विषयावर मिळेल ते वाङ्मय शोधण्याचा प्रयत्न केला. 'वाहतुक आणि परिवहन' हे विषय 'नगर रचना' या विषयाशीही निगडित आहेत. परिवहनांतही तीन प्रकार आहेत. १. भू-परिवहन, २. जल-परिवहन, ३. आकाश परिवहन.

यातील आकाश परिवहनाचा प्रारंभ १८ व्या शतकापासून सुरू झाला. जलपरिवहनाचा कांही भाग सेतुनिर्मितीमुळे साध्य होत आहे. प्रथमतः लेखकाचा सेतुनिर्मिती या विषयाशी अधिक संबंध आला असल्याने, त्या विषयांवर संस्कृत वाङ्मयात शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण जवळ जवळ काहीच वाङ्मय आढळले नाही. एक उल्लेख 'राजतरंगिणी' या कल्हणाच्या ग्रंथात आढळला तो असा,-

**''वितस्तायां स भूपालो बृहत्सेतुमकल्पयन् ।**
**ख्याता ततः प्रभृत्यैव तादृक्नौसेतु कल्पना ।।''**

त्या ('प्रवरसेन') राजाने 'वितस्ता' (सध्याची झेलम) नदीवर मोठ्या सेतूची निर्मिती केली. ही निर्मिती नौका एकाला एक लांबीच्या दिशेने जोडून नदीच्या एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत नेण्याइतकी लांब केल्याने त्यानंतर 'नौसेतु' ही कल्पना पुढे आली. सध्याच्या काळात सुद्धा विशेषतः भारताच्या उत्तर आणि उत्तरपूर्वभागात जेथे नद्यांची पात्रे खूप रुंद असतात- ८०० मीटर ते २५०० मीटरपर्यंत सुद्धा असतात आणि आर्थिक दृष्ट्या पक्क्या पुलाची बांधणी परवडणाऱ्या मर्यादेत बसू शकत नसल्यास, अशा तऱ्हेचे नौकेला नौका, लांबीच्या दिशेने जोडून नदीच्या एका तीराकडून दुसऱ्या तीराकडे जाण्यासाठी अशा नौकासेतूंची निर्मिती केली जाते. त्याला Pontoon Bridge असे तांत्रिक नाव आहे. अशा तऱ्हेचे पूल गंगा, यमुना, कोसी, ब्रह्मपुत्रा या नद्यांवर अद्यापही अस्तित्वात आहेत.

'सेतु' या नांवाचा उल्लेख असलेले एक काव्य उपलब्ध आहे. श्रीरामाने लंकेवर हल्ला करण्याची योजना आखली त्यावेळी लंकेत जाण्यासाठी वानरसेनेने समुद्रांत दगडगोटे टाकून सेतुनिर्मितीचा प्रयत्न केला. या विषयावर आधारित 'सेतुबन्ध' हे काव्य रचले गेले. प्रत्यक्षात या ग्रंथात सेतु-बांधकामाबद्दल जवळ जवळ काहीच उल्लेख नाही. काव्य मुख्यतः रावणवध कसा झाला या विषयावर आधारित आहे. या काव्याचे नावच फक्त 'सेतुबंन्ध' असे आहे. शिवाय लंकेत जाण्यासाठीचा रामसेतु हा थोडासा वादाचा विषय झालाअसल्याने या उल्लेखाशिवाय 'सेतुबंध' या काव्याचा या शोधनिबंधात कोठेही उल्लेख करण्यात आला नाही. परंतु, त्यानंतर 'रस्तेबांधणी' या विषयावर पुरातन काळात काय व्यवस्था होती, याबद्दल काही ग्रंथ

वाचनात आले. 'रस्तेबांधणी' हा विषय 'नगर रचना' (Town Planning) या विषयाशी पूर्णतः निगडित असल्याने 'रस्तेबांधणी' या विषयापुरते 'नगररचना' या विषयावरच्या माहितीचाही या शोधनिबंधात उल्लेख आला आहे.

या शोधनिबंधामागची उद्दिष्टे आणि त्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष 'परिवहन' आणि 'वाहतुक' या दोन्ही विषयांवर सध्याच्या काळात खूप प्रगती झाली आहे. परंतु प्राचीन काळी या विषयात काय व्यवस्था होती ही शक्य तेवढ्या उपलब्ध माहितीवर या शोधनिबंधात देण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात 'पुरनिवेश' (Town Planning) आणि 'वीथिद्वारादिमानम्' Standards for roads and Their entrances याबद्दलची माहिती, तत्संबंधातील संस्कृत ग्रंथातील उल्लेख यावरून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

खाली उल्लेख केलेल्या ग्रंथातून आवश्यक ती माहिती यानंतर देण्यात येत आहे.

१) अपराजित पृच्छा २) कौटिलीय अर्थशास्त्र ३) कामिकागम किंवा स्थापत्यवेद ४) मयमतम ५) मानसार ६) समराङ्गण सूत्रधार

या शोधनिबंधाची उद्दिष्टे आणि त्यांच्या मर्यादा.

१) 'प्राचीन काळातील वाहतूक आणि परिवहन व्यवस्था' या विषयावरील शोधनिबंधासाठी वर उल्लेख केलेल्या ग्रंथाचा संदर्भ घेतला आहे.

२) संदर्भित ग्रंथांचा कालावधी इ.स. ५०० ते इ.स. १२०० या कालावधीपुरता मर्यादित आहे.

**'अपराजित पृच्छा'**

'अपराजित पृच्छा' या ग्रंथात 'विश्वकर्मा'आणि त्याच्या चार मानसपुत्रापैकी एक मानसपुत्र 'अपराजित' या दोघांत 'अपराजिताने' विचारलेल्या शंकांची 'विश्वकर्मा' याने दिलेली उत्तरे संकलित केली आहेत.

'भारतक्षेत्रग्रामसंख्या प्रमाणम्'

भारतातील राज्यें आणि त्यांतील ग्रामांची संख्या यांचा तपशील या लेखांत देण्यात आला आहे.

''कान्यकुब्जे ग्रामसंख्या षट्त्रिंलक्षणानि च ।
अष्टादशलक्षमानं राज्यं गौडेश्वरे मतम् ।
तदर्धं कामरुपाश्च तत्समं मंडलेश्वरम्।
कार्तिकपुरे तत्संख्या चौडेलक्षव्द्दासप्तति: ।।''

कान्यकुब्ज किंवा कनौज राज्यांत ३६ लाख गांवे आहेत. गौड नरेशच्या राज्याचे उत्पन्न १८ लाख आहे. (नाणे कोणते याचा उल्लेख नाही). त्याच्या अर्धे म्हणजे ९ लाख कामरूप (आसाम) राज्याचे आहे. तेच उत्पन्न मण्डलेश्वराचेही आहे. इतर राज्यांचा उल्लेख आहे तो असा – 'दक्षराज्य (उज्जयिनी)' 'गुर्जर' 'कच्छ' 'मरुकोट (मारवाड)' त्रिगर्त (इंद्रप्रस्थच्या नैऋत्य दिशेला) किंवा 'जालंधर' 'अहिराज्य' (खानदेश) 'गुडादीप' (गौड, मध्यबंगाल आणि ओरिसा)

सूत्र-७३, 'पुरलक्षणम्'आता पुरांचे आकार, विस्तार आणि तेथील वस्ती याबद्दलची माहिती देतो.

वक्ष्ये पुरस्य चाकारे, साम्प्रतं लक्षणः पुनः ।

प्रशस्तं दोषरहितं पुरनामानि विंशति: ।। (१)

आता नगरांच्या दर्जाबद्दल आणि त्यांच्या क्षेत्रफळाबद्दल माहिती सांगतो. नगरे २० प्रकारची आहेत.

'माहेन्द्रं सर्वतोभद्रं सिहांवलोकवारुणे ।
नन्द्यावर्तं च नन्दाख्यं पुष्पकं चैव स्वस्तिकम्' ।।२
पार्श्वदण्डं जयन्तं च श्रीपुरं रिपुमर्दनम् ।
स्नाहं दिव्यमुत्तरं च धर्मं कमलशक्रदे ।।३
महाजयं पौरुषं चं साम्प्रतं कथितं बुधैः ।
पुराणां विशंतिश्चैव ख्याता भुतनमण्डलम् ।।४।।

'माहेन्द्र', 'सर्वतोभद्र', 'सिंहावलोकन', 'वारुण', 'नन्दाक्ष','नन्द्यावर्त','पुष्पक', 'स्वस्तिक', 'पार्श्वदण्ड'

गरज ही खालच्या दर्जाच्या लोकांना सदैव ग्रासणारी आपत्ती आहे आणि वरच्या दर्जाच्या लोकांना वाटणारा तो कंटाळा आहे. – स्कॉपनहँबर

'जयन्त' 'स्नाह', 'दिव्य', 'रिपुमर्दन', 'सौम्य', 'श्रीपुर', 'धर्म', 'काम', 'शक्र', 'महाजय' अशी २० प्रकारची नगरे सर्वज्ञात आहेत.

'माहेंन्द्रं चतुरश्रं च सर्वतोभद्रमायतम् ।
सिंहावलोकनं वृत्तं च व्तायतं तु  वारुणम्' ।।५

'माहेन्द्र नगराचा आकार चौरस आहे. 'सर्वतोभद्र' नगर आयताकृति आहे. 'सिंहावलोकन' गोलाकार आहे. आणि वारुण दण्डगोलाकार आहे.

'मुक्तकोणं च नन्दाक्षं नन्द्यावर्तं च स्वस्तिकमं ।
पुष्पकमष्टदलाख्यं च स्वस्तिकं चाष्टाश्चकम् ।।' ६

'नंन्दाक्ष' नगराला एकही कोपरा नाही. त्याचा आकार अस्ताव्यस्त आहे. 'नन्द्यावर्त' 'स्वस्तिक' आणि 'पुष्पक' या नगरांना आठही दिशांना रस्ते आहेत. 'स्वस्तिक' या नगराचा आकार स्वस्तिकाच्या आकृतिप्रमाणे आहे.

'यवाकृति जयन्तं च दण्डं स्यादतिदीर्घकम्
श्रीपुरं चैकप्राकारे व्दाभ्यां तु रिपुमर्दनम् ।।'७

'जयन्त' नगराचा आकार जवसाच्या (जवस बियाणे) आकारासारखा आहे. 'श्रीपुर' नगराला एकच तट आहे. 'रिपुमर्दन' नगराला दोन तट (संरक्षक भिंती) आहेत.

'शैलकुक्षौ तथा स्नाहं दिव्यकं शैलमस्तके ।
नद्युत्तरे च सौम्याख्यं सरिद्याम्ये तु धर्मकम् ।।' ८

'स्नाह' नगर डोंगराच्या पायथ्याशी वसवलेले असते, तर डोंगरमाथ्यावर वसवले जाणारे नगर 'दिव्यक' या नावाने ओळखले जाते. सौम्यक नगर नदीच्या उत्तरेस तर 'धर्मक' नगर नदीच्या दक्षिणेस वसवले जाते. अशी ही वीस प्रकारची नगरे जनतेसाठी आणि देवांसाठी (देवतुल्य माणसांसाठी) योजिली आहेत. त्यांत निवास करणाऱ्यांना, विप्रजन आणि राज्यकर्त्यांनाही कल्याणकारी आणि शांतीमय जीवन देणारी आहेत. या प्रत्येक नगराच्या विविधता आणि सुखसोई काय आहेत ते आतां सांगतो.

'माहेन्द्रं चतुरश्रं च प्रतापं कीर्तिवर्धनम् ।
वृध्दिदं सर्वतोभद्रं नित्यं तद्धद्रशान्तिदम् ।। ११
सिंहावलोकनं रम्यं च हरे ते रिपुरिषवधौ ।
वारुणे तु प्रजावृध्दिर्नन्दारव्ये नन्दनं चिरम् ।। १२

'माहेन्द्र' नगर आकाराने चौकोनी आहे. त्यांत निवास करणाऱ्यांना सामर्थ्य आणि समृद्धी मिळते. 'सर्वतोभद्र' नगरांत निवास करणाऱ्यांना अधिक समृद्धी आणि शांती मिळते. (सर्वच क्षेत्रात समृद्धी/ शांती मिळते).

'सिंहावलोकन' नगर सुंदर दिसतं आणि शत्रूंना अडचणीत आणतं. 'वारुण' नगर तेथील निवासितांसाठी समृद्धी आणतं. 'नन्द' नगर तेथील निवासितांना सुखी ठेवतं.

'नन्द्यावर्तं मङ्गलाख्यं त्रिदशानां तु पुष्पकम् ।
स्वस्तिकात्स्वस्तिकं प्रोक्तं जयन्तं च जयावहम् ।। १३'

'नन्द्यावर्त' नगरांत रहाणाऱ्याचे सर्वतोपरी कल्याण होते. 'पुष्पक' नगर देव-देवता व अत्यंत पुण्यवान् जनांसाठी उत्तम आहे. 'स्वस्तिकनगरवासी' सर्व क्षेत्रांत भरभराटीला येतात. आणि जयन्त नगरनिवासी  सर्व क्षेत्रांत विजयी होतात.

'वृध्दिदं पार्श्वदण्डं च श्रीपादं श्रीपुरं तथा ।
रिपुमर्दनरिप्वन्तं स्नाहं चैवाभयर्प्रदम् ।। १४
दिव्यकं देवभवनमुत्तरं चोत्तमोत्तमम् ।
धर्मं धर्मकरं नित्यं कमलं शान्तिदायकम् ।। १५
इन्द्रराज्योद्भवं शक्रं पौरुषं भीमविक्रमम् ।
महाजयं पुरं नाम सर्वदानन्दकारकम् ।। १६
इत्थमाकृतयो गुणाः कथितास्तव मयाधुना ।
शुक्राणां सुप्रशस्तांना पुराणां विंशतिस्तथा ।।१७।।'

'पार्श्वदण्ड' आणि 'श्रीपुर' निवासी अधिकाधिक समृद्धी प्राप्त करतात. 'रिपुमर्दन' निवासी (बहुधा सेनादल

वस्ती) शत्रूंचा संहार करते आणि सर्वांना भयमुक्त करते. 'दिव्यक' नगर सज्जन आणि सर्वोत्तम (देवतुल्य) नागरिकांसाठी चांगले आहे. (कल्याणदायी आहे.) 'उत्तम' नगर तेथील निवासितांना अधिकाधिक समृद्धी देते. 'धर्मनगर निवासी' पुण्यकर्माला चालना देतात. 'कमल' निवासी शांत जीवन जगतात. 'इन्द्र' राज्य निवासी तेथील सोयींमुळे अधिक पराक्रमी बनतात. 'महाजय' निवासी (सर्वच क्षेत्रांत यश मिळत असल्याने) सर्वदा उत्साही असतात. अशा प्रकारे वीस प्रकारच्या नगरांची विविधता आणि वैशिष्ट्ये मी तुला आता सांगितली.

पुरार्धेन भवेद्ग्रामो ग्रामार्धेन तु खेटकम् ।
खेटकार्धेन भवेत्कूटं कूटार्धेन तु खर्वटम् ।।२६

पुरे सप्तदशमार्गा ग्रामो वै नवमार्गतः
खेटके पञ्चामार्गाः स्युस्त्रिभिर्मार्गैश्च कूटकम् ।।२७

व्दौ मार्गौ खर्वटे ख्यातौ छन्दाः पञ्च प्रकीर्तितः ।
पुरग्रामखेटकं च कूटं च खर्वटाभिधम् ।।२८

(टीप - वर वेगवेगळया प्रकारच्या नगरांचा उल्लेख त्यात निवास केल्याने तेथील निवासितांचे फायदे या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे दिले आहेत)

(क्रमशः)

**- मधुकर गजानन दातार**

●●●



(पृष्ठ क्र.१५ वरून- **अर्थसंकल्प : वेगळे काहीतरी**)

देशाच्या उपग्रहाव्यतिरिक्त नियमितपणे इतर देशांच्या उपग्रह उड्डाणाना सुविधा पुरवत आहोत. अगदी व्यावसायिक तत्त्वावर. हा अर्थसंकल्प सादर होण्याच्या थोडेच दिवस आधी विक्रमी संख्येने उपग्रह प्रक्षेपित केले गेले होते. अशा प्रकल्पांना सहाय्यभूत होणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

'उरी : दी सर्जिकल स्ट्राइक' या सिनेमात दाखवलेल्या चित्राप्रमाणे एका तरुण विद्यार्थ्याने बनवलेला उपग्रह नुकताच प्रक्षेपित केला गेला आहे. अशा कमी वजनाच्या, कमी उंचीवर स्थिरावणाऱ्या, कमी अस्तित्व - काल (शेल्फ - लाईफ ) असणाऱ्या, कमी खर्चाच्या उपग्रहांचे शिक्षण, शेती सारख्या क्षेत्रांच्या दृष्टीने अतोनात महत्व आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करत त्याला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे.

त्यामुळे आपली अर्थव्यवस्था ही 'सेवा -क्षेत्र प्रधान' (सर्व्हिस सेक्टर डॉमिनेंट) अर्थव्यवस्था आहे इतकेच सांगणारा हा अर्थसंकल्प नाही; तर सेवा क्षेत्र प्राबल्यातही केवळ बँकिंग, इन्शुरन्स, हार्डवेअर, सॉफ्टवेअर ही काल आणि आजची सेवा - क्षेत्रेच नव्हेत तर जल - वाहतूक आणि अवकाश अशी आज व उद्याची सेवा - क्षेत्रे आणणारा हा अर्थसंकल्प आहे.

याला जर एक लाख डिजिटल विलेज या अर्थसंकल्पातल्या उल्लेखाची जोड दिली तर अजून एक आयाम जोडला जातो.

अशाही अर्थाने हा संक्रमणकारी अर्थसंकल्प आहे.

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

खुशमस्करी करणाऱ्या माणसाने कधी रागावता कामा नये! - यहुदी म्हण

# ओळख वनस्पतींची
## बारतोंडी

*'बारतोंडी' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

रिमझिम पावसात जंगलात फिरताना वेगळाच अनुभव येतो. पानांवर, फुलांवर व फळांवर लटकलेले टपोरे पाण्याचे थेंब, स्वच्छ धुतल्या गेलेली अन् ताजितवानी झालेली वृक्षराजी, मध्येच तुरुतुरु पळत जाणारे खेकडे, पानांवर बसलेले विविध कीटक व त्यांचे मनोहारी रंग अशाच धुंद वातावरणात एका झाडाकडे आपले लक्ष जाते. हिरव्या फळांनी लगडलेले हे झाड एरवी दुर्लक्षिले गेले असते. पण यावेळी ते आपले लक्ष वेधून घेतं ते त्याचा वैशिष्ट्यपूर्ण फळांमुळे. अनेक षटकोनी आकाराचे चामड्याचे तुकडे एकत्र शिवून तयार केलेल्या फुटबॉल/व्हॉलीबॉलसारखी दिसणारी ही फळं जरा हटकेच आहेत. त्यामुळेच ते आपले लक्ष वेधून घेते. अनेक तोंडं असणारे हे फळ बारतोंडी म्हणून परिचित आहे.





सदाहरीत असणारे हे झाडं कोकणात सर्वत्र आढळते. सह्याद्रीच्या जंगलात तसेच मुंबईचे फुप्फुस समजले जाणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातही ही झाडे विपुल प्रमाणात आहेत. ५ ते १० मीटर उंच वाढणाऱ्या ह्या झाडास त्याच्या बहुविध गुणांमुळे औषधीशास्त्रात देखील मानाचे स्थान आहे. मार्च-एप्रिलमध्ये हे झाड सहा पांढऱ्या पाकळ्या असलेल्या व ताऱ्यासारख्या दिसणाऱ्या सुगंधी फुलांनी बहरलेले असते. मे-जूनमध्ये यावर फुटबॉलसारखी दिसणारी वेगळ्या धाटणीची फळे दिसू लागतात; पण फुलांकडे बारकाईने बघितले तर लक्षात येईल की, फुले डहाळीवर नसून एका चेंडू सारख्या गोलावर चारही बाजूंनी फुलली आहेत. अन् हाच गोल मोठा होऊन पुढे फळाचे रूप धारण करतो. प्रत्येक फुलांचे एक तोंड अशी अनेक तोंडे त्यामुळेच हे एक संयुक्त फळ आहे. याचे अनेक औषधी उपयोग असले तरी ह्या झाडाच्या मुळांमध्ये गुलाबी रंग मिळतो. हा रंग कापड उद्योग तसेच इतरत्रही उपयोगी आहे. उत्तरेतील महिला वर्गात पायाला गुलाबी रंग लावतात. तो अळीता किंवा अलता याच झाडाच्या मुळांपासून तयार केला जातो. या रंगासाठी तसेच औषधासाठी देखील या झाडाची हल्ली मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. १० ते १५ सें.मी. ची हृदयाकार परंतु टोकदार चकचकीत दिसणारी पाने या झाडाची लांबूनच ओळख करून देतात. सुरुवातीला हिरवीगार दिसणारी फुटबॉल सारखी फळे पिकल्यानंतर पिवळी पांढरी दिसतात. या फळांमध्ये सी विटॅमीन भरपूर आहे. पण त्याच्या उग्र चवीमुळे ती खाण्यासाठी वापरली जात

(पृष्ठ क्र.२४ वर)

# एअर स्ट्राईकची रणनीती आणि परिणामांचा वेध

*पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेल्या एअर सर्जिकल स्ट्राईकविषयीची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेल्या एअर सर्जिकल स्ट्राईकच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला एक कठोर दणका दिला आहे. भारताचा दहशतवाद प्रतिरोधनाचा एकूणच दृष्टिकोन बदलला आहे. अशा प्रकारे दहशतवादाचे प्रतिरोधन आपण आजवर करत नव्हतो. या हल्ल्याला  प्री एमटीव्ह अ‍ॅटॅक म्हणतात. अशा प्रकारचे हल्ले अमेरिका, इस्राईलकडून केले जातात. भारताने ही पद्धती पहिल्यांदाच वापरली आहे. या हल्ल्यासाठीची एलओसीची निवड, बालाकोटाला लक्ष्य करणे हे सर्व अत्यंत सुनियोजित पद्धतीने आणि संभाव्य परिणामांचा विचार करून करण्यात आले आहे. या कारवाईमुळे पाकिस्तानची आता चहुबाजूंनी कोंडी झाली आहे.

अपेक्षेप्रमाणेच भारतीय लष्कराने प्रचंड मोठा दणका पाकिस्तानला दिलेला आहे. २६ फेब्रुवारी रोजी पहाटे ३.३० वाजता भारताच्या १२ मिराज विमानांनी एलओसी पार करून पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्रवेश केला आणि भारतीय एअरबेसपासून ३०० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बालाकोट शहरामध्ये असणाऱ्या जैश ए मोहम्मदच्या सर्वांत मोठ्या प्रशिक्षण तळावर तुफान बॉम्बवर्षाव केला. तेथे २५० ते ३०० दहशतवादी प्रशिक्षण घेत होते. हा तळ पूर्णतः बेचिराख करण्यात आला आहे. अपेक्षेप्रमाणे आणि नेहमीप्रमाणे पाकिस्तानने असा हल्ला झाल्याचे नाकारले आहे; मात्र भारताने हा हल्ला अत्यंत यशस्वीपणे केलेला आहे हे वास्तव आहे. या हल्ल्याला एअर सर्जिकल स्ट्राईक असे म्हणतात. उरीवरील दहशतवादी हल्ल्यानंतर आपण ग्राऊंड सर्जिकल स्ट्राईक केला होता. पुलवामावरील हल्ल्यानंतर १० ते १२ दिवसांच्या काळानंतर ही कारवाई करण्यात आली. या काळात भारताने दीर्घकालीन धोरणे आखत पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय दृष्ट्या एकटे पाडण्यासाठी, आर्थिक दृष्ट्या कोंडी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित करण्यासाठी, तसेच सिंधू नदी पाणीवाटप करारातील भारताच्या वाट्याचे पाणी पूर्णतः वापरण्यासाठी यथायोग्य पावले उचलली. अल्पकालीन किंवा तात्काळ करावयाच्या कारवाईबाबतचे सर्वाधिकार लष्कराला दिले असून योग्य वेळी निर्णय घेतला जाईल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणाने पुलवामा हल्ल्यानंतर सांगितले होते.

**हल्ल्याची तयारी**

पुलवामावरील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान स्थित जैश ए मोहम्मदने स्वीकारल्यानंतर भारताने प्रत्युत्तराची तयारी सुरू केली होती. यासाठी एअर स्ट्राईकचा पर्याय निर्धारित केल्यानंतर त्यासाठी जवळपास १० दिवस सर्व प्रकारची गुप्तचर माहिती गोळा केली गेली, जिथे हल्ला करावयाचा आहे तेथील स्थिती जाणून घेण्यात आली, तेथे सामान्य नागरिक नाहीत ना, त्यांना इजा पोहोचायला नको याचा विचार करण्यात आला आणि त्यानुसार धोरण ठरवण्यात आले.  तसेच निर्धारित ठिकाणाची रेकी केली गेली आणि त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.  या कारवाईला प्रेसिजन अ‍ॅटॅक किंवा लेजर गाईडेड मिसाईल अ‍ॅटॅक म्हणतात.

उपकारांचे ओझे शिरावर घेऊ नका; ही एक महान आणि उत्कृष्ट अशी कला आहे. - डॉ. फुलर

**एलओसीच का?**

या हल्ल्यासाठी आपण जाणीवपूर्वक एलओसी म्हणजेच ताबारेषेजवळच्या क्षेत्राची निवड केली. यासाठी मागील काळात केलेला सर्जिकल स्ट्राईकही एलओसीवरच केलेला होता. कारण हा भारताचाच भाग आहे. या हल्ल्यांसाठी आंतरराष्ट्रीय सीमारेषेचा वापर केला नाही. कारण तेथे कोणतीही कारवाई केल्यास पाकिस्तानला संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये तात्काळ आवाज उठवून भारताने आमच्यावर हल्ला केल्याची तक्रार करण्याची संधी मिळाली असती. आता तसे करता येणार नाही. कारण हा हल्ला पाकव्याप्त काश्मीरमध्ये झालेला आहे. हा मूळचा भारताचाच भाग आहे. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये हा भाग वादग्रस्त क्षेत्र म्हणून नोंदवलेला आहे. त्यामुळे भारताने पाकिस्तानच्या हद्दीत आक्रमण केले असा दावा पाकिस्तानला करता येणार नाही. या सुनियोजित पावलामुळे पाकिस्तानची मोठी कोंडी झाली आहे.

**पाकिस्तान हतबल**

दुसरा मुद्दा म्हणजे, भारताच्या या कारवाईचा पाकिस्तान स्वीकारही पूर्णपणाने करू शकणार नाही. कारण ज्याठिकाणी हा हल्ला झाला ते बालाकोट इस्लामाबादपासून अवघ्या ८ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे भारताने दहशतवादी तळांवर हल्ला केला हे मान्य केल्यास जैश ए मोहम्मदचे हे तळ पाकिस्तानच्या मदतीनेच चालवले जात होते असे आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध होईल. तसेच या हल्ल्यात पाकिस्तानी नागरिकही मारले गेलेले नाहीत. तसे झाले असते तर पाकिस्तानला भारताविरुद्ध आरडाओरड करण्यास संधी मिळाली असती; पण तीही संधी पाकिस्तानला उरलेली नाही. म्हणूनच पाकिस्तानने सुरुवातीला असा हल्ला झाल्याचे नाकारले होते. भारतावर होणारे दहशतवादी हल्ले हे 'नॉन स्टेट ॲक्टर्स'कडून होतात आणि त्यांच्याशी आमचा काहीही संबंध नाही असे आजवर पाकिस्तान सांगत आला आहे. पण आता भारताची कारवाई मान्य केल्यास हे संबंध पाकिस्तानला नाकारता येणार नाहीत. त्यामुळे भारताच्या या एअरस्ट्राईकने दहशतवादी, पाकिस्तानी लष्कर, आयएसआय यांना कडक इशारा देतानाच त्यांची कोंडीही केली आहे.

**अण्वस्त्र हल्ल्याच्या धमक्यांचा बागुलबुवा भेदला:-**

१९९८ मध्ये भारत आणि पाकिस्तान दोघांचे अण्वस्त्रीकरण झाले. यानंतर पाकिस्तानने सातत्याने या अण्वस्त्रांचा बागुलबुवा केला. दहशतवादी हिंसाचाराला प्रत्युत्तरादाखल भारताकडून पाकिस्तानवर एखादा जरी हल्ला झाला तरी आम्ही त्याविरोधात अण्वस्त्रांचा वापर करू शकतो अशा धमक्या पाकिस्तान गेली २०-२५ वर्षे सातत्याने देत आला आहे. या धमक्यांमुळेच आपण आजवर असंख्य हल्ले सहन करत राहिलो. पण त्यातून पाकिस्तानची तशी मानसिकताच बनत गेली. आपण हल्ले करत राहू आणि भारत सहन करत राहील असा पाकिस्तानचा समज बनत गेला. या समजाला, मानसिकतेला आता भारताने छेद दिला आहे. भारत आता ताकदीने कठोर पलटवार करू लागला आहे. अर्थात, अशा पलटवारांमुळे दहशतवादी कारवाया थांबतील असे नाही; पण आपण भारताविरोधात कुरघोडी केल्यास भारत गप्प बसणार नाही हा संदेश पाकिस्तान लष्कराला आणि आयएसआयला गेला आहे. तसेच जैश ए मोहम्मद, जमात उद दवा, हिज्बुल मुजाहिद्दीन आदी दहशतवादी संघटनांनाही यातून योग्य तो इशारा भारताने दिलेला आहे.

**पारंपरिक युद्धाची शक्यता किती?:-**

या एअर स्ट्राईकने बिथरलेला पाकिस्तान शांत बसणार नाही. तथापि, युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता फार कमी आहे. कारण भारत आणि

पाकिस्तान दोन्हीही देश युद्ध टाळण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आजवर दोन्ही देशांत तीन पारंपरिक युद्धे झाली आहेत. या तिन्ही युद्धांत पाकिस्तानला सपाटून मार खावा लागला आहे. तसेच या तिनही युद्धांमध्ये दोन्ही देशांकडे अण्वस्त्रे नव्हती. आज दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत. अलीकडेच पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांनी एक सूचक वक्तव्य केलेले होते. यातून त्यांनी भारताला प्रत्युत्तर देण्याची भाषा करणाऱ्या इम्रानखानला कानपिचक्या दिल्या होत्या. पाकिस्तानने एक अणुबॉम्ब टाकल्यास भारत २० अणुबॉम्ब पाकिस्तानवर टाकेल असे ते म्हणाले होते. मुशर्रफ यांच्यासारख्या मुत्सद्दी नेत्याला भारताच्या सामर्थ्याची कल्पना आहे. तसेच या दोन्ही देशांत जर युद्धाचा भडका उडाला तर तो केवळ या दोन देशांपुरताच मर्यादित न राहता संपूर्ण दक्षिण आशिया, पूर्व आशिया, पश्चिम आशिया हे होरपळले जातील. त्यामुळे पाकिस्तान चुकूनही युद्धाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न करणार नाही.

आता राहिला मुद्दा चीनचा. चीन आणि पाकिस्तानची मैत्री कितीही घनिष्ट असली आणि अगदी शीतयुद्धकाळापासून ती चालत आलेली असली तरीही भारताविरुद्धच्या तीनही युद्धांमध्ये चीन कधीही प्रत्यक्षपणाने पाकिस्तानच्या बाजूने उतरलेला नाही. अप्रत्यक्षपणाने चीनने पाकिस्तानची बाजू उचलून धरली; पण प्रत्यक्ष युद्धात चीन कधीही पाकिस्तानच्या मदतीला आलेला नाही. आताही चीन पाकिस्तानच्या बाजूने उतरण्याच्या शक्यता फार कमी आहेत. तसेच भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या द्विपक्षीय संबंधांमध्ये सुधारणा केलेली असून अमेरिका, जपान या देशांशी भारताची मैत्री घनिष्ट बनत गेली आहे. त्यामुळे पाकिस्तानसोबत युद्ध झाले आणि चीन त्या युद्धात उतरल्यास अमेरिका, जपान हे देश भारताच्या बाजूने उभे राहतील. कारण सेनकाकू बंदरावरून जपानचा चीनशी प्रचंड वाद सुरू आहे. अमेरिकेचेही चीनशी व्यापारयुद्ध सुरू असून दक्षिण चीन समुद्रातील चीनच्या वाढत्या आक्रमकतावादावरून अमेरिका नाराज आहे. तसेच आशिया खंडात अमेरिका चीनचा काऊंटरवेट म्हणून भारताकडे पहात आहे, याची पूर्ण कल्पना चीनलाही आहे. त्यामुळे चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडॉरच्या माध्यमातून अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केल्यामुळे चीन आपल्या पाठिशी राहील असे पाकिस्तानला वाटत असेल तर तो एक भ्रम ठरू शकतो. दुसरीकडे इस्लामिक देशही पाकिस्तानला मदत करतील असे नाही. तसेच आज मुळातच पाकिस्तानची अर्थव्यवस्था डबघाईला आलेली आहे. अक्षरशः हातात कटोरा घेऊन पाकिस्तान आर्थिक मदतीसाठी याचना करत फिरत आहे. अशा वेळी पाकिस्तानला युद्धाचा मार्ग निवडणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही. ऑक्टोबर महिन्यामध्ये फायान्शियल ॲक्शन टास्क फोर्सचे पथक पुन्हा पाकिस्तानात जाणार आहे. त्यांनी पाकिस्तानला ब्लॅक लिस्टमध्ये टाकल्यास पाकिस्तानला कोणीही आर्थिक मदत करणार नाही. त्यामुळे पाकिस्तानला जैश ए मोहम्मद, जमात उद दवा आदी दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई करावी लागणार आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता पाकिस्तान प्रत्यक्ष युद्धाचा मार्ग अवलंबण्याची शक्यता नाही. मग पाकिस्तान काय करेल? तर पाकिस्तान नेहमीप्रमाणेच अघोषित युद्धाचाच मार्ग अवलंबत राहील. म्हणूनच येणाऱ्या काळात भारतीय लष्कर, तपास यंत्रणा, गुप्तचर यंत्रणा, पोलिस दले आणि जनतेला अत्यंत दक्ष राहावे लागणार आहे

**प्रतिरोधनाचा दृष्टिकोन बदलला**

भारताचा दहशतवाद प्रतिरोधनाचा एकूणच दृष्टिकोन बदलला आहे. अशा प्रकारे दहशतवादाचे प्रतिरोधन आपण आजवर करत नव्हतो. या हल्ल्याला प्रिएंटिव ॲटॅक म्हणतात. याचा अर्थ, आपल्यावर भविष्यात होऊ शकणाऱ्या संभाव्य हल्ल्यांना गृहित

धरून ते थोपवण्यासाठी अथवा नष्ट करण्यासाठी केलेला हल्ला. अशा प्रकारचे हल्ले अमेरिका, इस्राईलकडून केले जातात. भारताने ही पद्धती पहिल्यांदाच वापरली आहे. बालाकोटातील दहशतवादी तळामध्ये २५० प्रशिक्षित दहशतवादी होते. त्यांनी भविष्यात भारतात येऊन हिंसाचार घडवून आणलाच असता. त्यापूर्वीच आपण त्यांना कंठस्नान घातले.

**डिफेन्सिव डिफेन्स कडून ऑफेन्सिव डिफेन्सकडे**

दुसरी गोष्ट म्हणजे आपण दहशतवादाबाबतचे आपले धोरण बदलले आहे. पूर्वी आपले धोरण 'डिफेन्सिव डिफेन्स' असे होते. आता आपले धोरण 'ऑफेन्सिव डिफेन्स' आहे. याचाच अर्थ आपण आपल्या रक्षणार्थ हल्ला करणे. आजवर भारताने स्वतःवर एक बंधन घालून घेतले होते. त्यानुसार भारत कधीही पहिल्यांदा हल्ला करणार नाही. मात्र ताज्या कारवाईत भारताने प्रथम हल्ला केला आहे. त्यामुळे आपल्या आजवरच्या चौकटीला आपण छेद दिला आहे.

**पाकच्या समजाला छेद**

पुलवामावरील हल्ल्याचा बदला घेण्याची घोषणा केल्यानंतर भारत पुन्हा एकदा जमिनीवरून सर्जिकल स्ट्राईक करेल अशी पाकिस्तानची धारणा होती. त्यामुळे पाकिस्तानने सीमारेषेवरील दहशतवादी तळ हलवले होते आणि त्यांना बालाकोटमध्ये ठेवले होते. हे ठिकाण उरीपासून ८० किलोमीटर अंतरावर आहे. इतक्या आतपर्यंत भारतीय सैन्य येईल असे त्यांना वाटले नव्हते. पण भारताने हवाई हल्ले केल्याने पाकिस्तानची चाल साफ फसली.

**बालाकोटच का? बहावलपूर का नाही?**

बालाकोटपेक्षाही बहावलपूरमध्ये दहशतवाद्यांचे मोठे प्रशिक्षण तळ आहे. तिथे दहशतवाद्यांचे दोन महिन्यांचे प्रशिक्षण चालते. तेथे ३५० एके-४७ आणि दारूगोळा ठेवलेला आहे. पख्तुनवाजवळील बालाकोटा हे सर्वांत मोठे भरतीचे ठिकाण आहे. जैश ए मोहम्मदचे सर्व दहशतवादी पख्तुनवामधून येतात. तिथून त्यांना पूँछजवळ असणाऱ्या बालाकोटमध्ये आणून भारतात घुसवले जाते. अशी साधारण कार्यपद्धती आहे. बहावलपूरमध्ये हल्ला केला असता तर सामान्य पाकिस्तानी नागरिक मारले जाण्याची शक्यता होती. म्हणूनच आपण बहावलपूरला बगल देऊन बालाकोटामध्ये हल्ले केले.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

●●●

(पृष्ठ क्र.२० वरून-**ओळख वनस्पतींची–बारतोंडी...**)

नाहीत. मात्र त्यांचा औषधासाठी उपयोग होतो. झाडांची मुळे देखील झाडांच्या विशिष्ट वयापर्यंतच रंगद्रव्याने परिपूर्ण असतात. झाड जसजसे मोठे होते तसे मुळामधील रंगद्रव्य कमी होते. म्हणून हल्ली त्याची शेती करून जास्तीत जास्त रंग मिळविण्याकडे कल आहे. शोभेचे झाड म्हणूनही आपल्या परिसरात हे झाड लावण्यास हरकत नाही. या झाडाचे शास्त्रीय नाव Morinda pubescence असे असून ते वृक्ष मित्रांमध्ये मोरींडा किंवा बारतोंडी म्हणूनच परिचित आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग**

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्व प्राथमिक विभागात प्रत्येक महिन्यात विविध उपक्रम राबविण्यात येतात. फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या उपक्रमांची ही थोडक्यात माहिती.

**२ फेब्रुवारी २०१९ नाइट स्टे**

प्रत्येक वर्षी नाइट स्टे, एक रात्र शिक्षकांबरोबर शाळेत रहाणे, हा सिनियर विभागातील मुलांसाठी एक अद्भुत अनुभव असतो. ह्या वर्षी २ फेब्रुवारी रोजी नाइट स्टे घेण्यात आला. शनिवारी संध्याकाळी ७ वाजता सर्व मुले शाळेत आली. मुलांच्या मनोरंजनासाठी बोलक्या बाहुल्यांचा कार्यक्रम, नाच, गाणी, खेळ, शेकोटी असे विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. रात्री आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबर जेवताना मुलांनी पावभाजी आणि गुलाबजामवर येथेच्छ ताव मारला. जेवणानंतर रात्रीच्या थंड वातावरणात शेकोटीचा आनंद घेतल्यानंतर सर्व मुले स्वतःच्या वर्गात गेली. शिक्षकांच्या मदतीने त्यांनी कपडे बदलले आणि अंथरूण घातले. मित्र-मैत्रिणींबरोबर गप्पा मारत गाढ झोपली. घरी आढेवेढे घेणारी मुले सकाळी सहा वाजता शिक्षकांच्या एका हाकेत उठली. एकमेकांच्या मदतीने अंथरुणे आवरली आणि बॅग भरून घरी जायला तयार झाली. रविवारी सकाळी सात वाजता नाइट स्टेच्या सुखद आठवणी बरोबर घेऊन मुले घरी गेली.

**११ फेब्रुवारी - गोष्टी सांगणे (नर्सरी विभाग)/ वक्तृत्व-(सिनियर विभाग)**

११ फेब्रुवारी रोजी नर्सरी विभागातील मुलांनी मराठी, इंग्रजी भाषेत हावरट ससा, लाकुडतोड्या, बुडबुड घागरी अशा विविध गोष्टी सांगितल्या.

**वक्तृत्व** - सिनियर केजी विभागातील मुलांनी इंग्रजीत आपल्या देशाची (भारताची) माहिती सांगितली.

ह्या उपक्रमांमुळे मुलांना समुहासमोर बोलताना वाटणारी भीती कमी होण्यास मदत होते.

**१४ फेब्रुवारी - वार्षिक कला आणि विज्ञान प्रदर्शन :**

शैक्षणिक उपक्रमातील एक महत्त्वाचा दिवस- वार्षिक कला आणि विज्ञान प्रदर्शन. ज्याची तयारी दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीपासून केली जाते. ह्यावर्षी वार्षिक विज्ञान आणि कला प्रदर्शन १४ फेब्रुवारी रोजी पार पडले.

नर्सरी विभागातील वर्ग मुलांनी रंगविलेल्या चित्रांनी, विविध शैक्षणिक खेळण्यांनी, तक्ते-माहितीपर लेखांनी सजविला होता. मुलांनी अंगठ्याचे ठसे तसेच रंगीत पिसे शिक्षकांच्या मदतीने चिकटवून मोर व पोपटाचे चित्र अधिक आकर्षक केले होते.

व्हरांड्यात विविध आकारांची सुबक रांगोळी काढण्यात आली होती. प्रदर्शन पहायला येणाऱ्या पालकांना मुलांनी प्रतिकृती आणि तक्तांच्या सहाय्याने पाणी वाचविण्याबद्दल व भारतातील तीन ऋतूंची थोडक्यात माहिती सांगितली. तसेच मुलांनी शाळेत घेण्यात येणाऱ्या ADL उपक्रमांची प्रात्यक्षिके करून दाखविली. उदा. साबणाचे पाणी घुसळणे, चिमट्यांच्या सहाय्याने स्पंजचे तुकडे एका वाटीतून दुसऱ्या वाटीत ठेवणे, चार्ट आणि चित्राच्या सहाय्याने लिखाणाची पूर्णतयारी इत्यादी. सर्व पालकांनी मुलांच्या आत्मविश्वासाची भरभरून स्तुती केली.

ज्युनिअर, सिनियरचे वर्गही तक्ते, शैक्षणिक खेळणी, मुलांनी रंगविलेली चित्रे, तोरणांनी सजविले होते. तसेच व्हरांड्यातील सूचना फलकावर ज्युनिअर विभागातील मुलांनी वेगवेगळ्या फुलांवर स्पंज, झेंडूचे फूल, काटा, कांदा ह्यांचे ठसे काम केलेली चित्रे; तर सिनियर विभागातील मुलांनी विविध आकर्षक फुलपाखरांवर कोलाजकाम केलेली चित्रे लावण्यात आली होती. ज्युनिअर विभागातील मुलांनी कात्री, ड्रॉपर अशी उपकरणे, शून्याची संकल्पना, तरंगणे-बुडणे अशा संकल्पना; तर सिनियर विभागातील मुलांनी दिवस-रात्र कशी होते, मापन, हवेचे विविध उपयोग इत्यादींची माहिती दिली. पालकांनी मुलांच्या सादरीकरणाची स्तुती केली.

**१८ फेब्रुवारी – सहाय्यकांची वेशभूषा (Dress as pe rout helpers)**

१८ फेब्रुवारी रोजी नर्सरी विभागातील मुलं रोजच्या जीवनात आपल्याला मदत करणारे डॉक्टर, शिक्षक, इंजिनीअर, वाहतुक पोलिस, शेतकरी, सैनिक इत्यादी बनून आले होते. त्यांनी स्वतःची माहिती इतर मुलांना थोडक्यात सांगितली. मुलांचे सादरीकरण प्रशंसनीय होते.

**२५ फेब्रुवारी – सामान्य ज्ञान**

ज्युनिअर, सिनिअर विभागातील मुलांना सामान्य ज्ञानावर आधारीत प्रश्न विचारण्यात आले. मुलांनी प्रतिसाद उत्तम दिला.

**१९ फेब्रुवारी – शिवजयंती**

**२७ फेब्रुवारी – मराठी दिवस**

१९ फेबुवारी शिवजयंती आणि २७ फेब्रुवारी मराठी दिन साजरा करण्यात आला. शिवजयंतीला शिक्षकांनी मुलांना शिवाजी महाराजांची थोडक्यात माहिती सांगितली.

**मराठी दिन –** आपली राज्यभाषा मराठी आहे. २७ फेब्रुवारी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज)-मराठी साहित्यातील अग्रगण्य लेखक व कवी ह्यांचा जन्मदिवस. त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस 'मराठी दिन' म्हणून साजरा केला जातो. ह्या दिवशी मुलांना मराठी अभिमान गीत ऐकविण्यात आले आणि शिक्षकांनी कुसुमाग्रजांची थोडक्यात माहिती सांगितली. तसेच मुलांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे असे सांगितले.

**दैनंदिन वार्ता**

आपल्या देशात तसेच जगात होणाऱ्या घडामोडींबद्दल मुलांना माहिती असावी ह्या उद्देशाने प्रत्येक शुक्रवारी सामूहिक प्रार्थने नंतर दैनंदिन वार्ता सांगणे हा उपक्रम सुरू केला. ज्युनिअर विभागातील मुलांना शिक्षक बातम्या सांगतात, तर सिनियर विभागातील मुले स्वतः बातम्या सांगतात. ह्या उपक्रमाला मुलांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भारत व पाकिस्तान या देशांतील नुकत्याच घडलेल्या घटनांची माहिती मुलांनी सांगितली.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**'रोशनी' मासिकाचे प्रकाशन**

रोशनी म्हणजे प्रकाश. 'रोशनी' मासिक सौ. ए. के. जोशी इं. मिडियम स्कूलमधील अधिक्षक श्रीमती रोशन जाल पटेल यांच्या स्मरणार्थ चालू करण्यात आले. ह्यावर्षी २५ व्या वर्षात 'रोशनी' मासिक पदार्पण करीत आहे. या मासिकाचे श्रेय शाळेच्या अधिष्ठाता सौ. कोल्हटकर मॅडम यांचे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली 'मासिक समिती' शाळेमधील विद्यार्थ्यांमधील लेखनकला, कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी नेहमी सजग असते. हे मासिक अल्पावधीत विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झाले आहे.

शहाणा मनुष्य स्वतःच्या उत्पन्नाप्रमाणे स्वतःच्या अक्कलहुशारीच्या मर्यादेतच जगेल. – चेस्टरफिल्ड

पहिल्या भागामध्ये सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिशु वर्ग, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक हे आपल्या विभागांच्या वर्षभरातील घडामोडींचा आढावा सादर करतात; त्या नंतरच्या विभागात इंग्रजी, हिंदी, मराठी, संस्कृत, गणित, शास्त्र, समाजशास्त्र, खेळ, चित्रकला, संगीत या विविध विषयांवरचे लेख विद्यार्थ्यांकडून लिहिले जातात. या मासिकाचे वैशिष्ट्य म्हणजे हे लेख विद्यार्थ्यांकडून लिहिले जातात. अनेक प्रकारचे लेख, कविता, छोट्या गोष्टी, विनोदी किस्से विद्यार्थी स्वतः लिहितात. संपादकीय लिहिण्यात शिक्षकांचा वाटा असतो, हे या मासिकाचे वैशिष्ट्य आहे. शाळेचे माजी विद्यार्थी आपल्या शालेय जीवनातील आठवणी लिहितात, ह्या माजी विद्यार्थ्यांना शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानित करण्यात येते. 'जाहिरात नसणे' हे देखील या मासिकाचे वैशिष्ट्य आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी ज्यांनी त्या शैक्षणिक वर्षात देदीप्यमान यश मिळवले आहे त्यांचेही फोटो छापण्यात येतात. मासिकाच्या मलपृष्ठावर त्या शैक्षणिक वर्षात झालेल्या उपक्रमांचे फोटो असतात. यापुढेही 'रोशनी' मासिकाची वाटचाल अशीच राहो ही सदिच्छा सौ. ए. के. जोशी परिवाराची आहे.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**उच्च शिक्षणास नैतिकतेचे अधिष्ठान हवे : डॉ. विजय बेडेकर**



विद्या प्रसारक मंडळ संचालित व मुंबई विद्यापीठ संलग्न  जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय व डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था यांचा संयुक्त पदवीदान समारंभ दि ११ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी १० वाजता विप्रमच्या ज्ञानद्वीप संकुलातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात, मंडळाच्या कार्यक्रमातील नेटकेपणा, वक्तशीरपणा आणि सुव्यवस्था या वैशिष्ट्यांसह संपन्न झाला. या पदवीदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर चारही महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. माधुरी पेजावर, डॉ. सुचित्रा नाईक, डॉ. नीतिन जोशी, डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्या उपस्थित होत्या.

या समारंभात कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, व विधी या विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर व विद्यावाचस्पती या पदव्या डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य आणि डॉ. दिलीपकुमार नायक, डॉ. प्रभाकर आपटे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना नैतिक बांधिलकी व सामाजिक बांधिलकीची शपथ देण्यात आली.

आपल्या दीक्षांत भाषणामध्ये मत व्यक्त करताना डॉ. विजय बेडेकरांनी भारतातील उच्च शिक्षणाचा धावता आढावा घेतला. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांच्या समोर असलेली आव्हाने व संधी, भारताच्या वाढत्या लोकसंख्येविषयी आणि पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अफाट संख्ये विषयी, त्याचवेळी शिक्षणाच्या दर्जा विषयी भाष्य करून त्यावर त्यांनी प्रकाश टाकला. पुढे डॉ. बेडेकर यांनी जीवनात प्रत्येक क्षेत्रात काम करताना सामाजिक भान व नैतिकतेची कास न सोडण्याचा मोलाचा सल्ला दिला.

जे पूर्वी दुर्गुण होते, ते आता शिष्टाचार झालेत. – सिनेका

या पदवीदान समारंभास विद्यार्थी,पालक, प्राध्यापक व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पदवीदान समारंभ**

महाविद्यालयातील अनुदानित व स्वयं अर्थसहाय्यीत विभागाचा पदवीदान समारंभ दि. १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी कात्यायन सभागृहात पार पडला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी बहाल करण्यात आली. डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना 'स्वप्न पहा व ती अस्तित्वात आणण्यासाठी अथक




परिश्रम करा' असा सल्ला दिला. या प्रसंगी सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात १००० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. प्रा नीतिन पागी यांनी या सम्पूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनाची जबाबदारी सांभाळली.

**'Towards Empowered India: an Ambedkarite Perspective' या विषयावर कार्यशाळा**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात दि.१५ फेब्रुवारी२०१९ रोजी तत्वज्ञान विभाग व संशोधन केंद्र, राज्यशास्त्र विभाग व मराठी संशोधन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'Towards Empowered India: an Ambedkarite Perspective' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी भारतरत्न डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाचा आवाका खूप मोठा असल्याचं नमूद केलं. डॉ. नाईक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचाराचा दाखला देत. 'Towards Empowered India: an Ambedkarite Perspective' असे त्या म्हणाल्या.

प्रमुख वक्ते डॉ. यशदत्त अलोने यांनी Empowered India an Ambedkarite Perspective या विषयावर व्याख्यान दिले. डॉ. अलोने हे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली, येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांनी डॉ. आंबेडकरांना केवळ एकाच चाकोरीत न पाहता त्यांचा विविध बाजूने विचार करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि भारताच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या पैलूंचा उलगडा केला.

दुसऱ्या सत्रात बिर्ला महाविद्यालयाचे तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. विप्लव ढोणे यांनी Celebration of Differences and Dr Ambedkar Trinity या विषयावर विचार मांडले. डॉ. आंबेडकरांच्या बुद्ध धर्मात धर्मांतर करण्यामागील भूमिका विशद करताना 'प्रत्युत समुत्पाद' या बुद्ध तत्त्वज्ञानातील संज्ञेची उकल केली.

या प्रसंगी तत्त्वज्ञान व राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर शोधनिबंध सादर केले. या कार्यशाळेच्या संयोजनात प्रा. प्रियंवदा टोकेकर, प्रा. श्वेता अहिरे, प्रा. रुता वैती, प्रा. सुप्रिया मोरे व प्रा. शीतल चाबुकस्वार,

ज्याला एकांतवासात आनंद वाटत नाही, त्याला मुक्तीमध्ये स्वारस्य वाटणार नाही! - नित्शे

प्रा. अविनाश वाघमारे, प्रा. स्वप्नील मयेकर यांनी मोलाची भूमिका बजावली. या कार्यशाळेत ७५ विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

**मनोरुग्णांप्रती संवेदनशील होण्याची गरज : डॉ. भरत वाटवानी**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेचे १८ वे पुष्प मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भरत वाटवानी यांनी भावना आणि सामाजिक कार्य या विषयावर विचार मांडत गुंफले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविकात महात्मा गांधींच्या अंत्योदय व रस्किनच्या Unto this Last या संकल्पनांचा उल्लेख करत समाजाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास पोचायला हवा असं मत मांडलं. डॉ. भरत वाटवानी यांनी जवळपास ७ हजार मनोरुग्ण (ऑटिस्टिक) मुलांचे पुनर्वसन केल्याचाही उल्लेख त्यांनी केला.

डॉ. भरत वाटवानी यांनी आपल्या व्याख्यानात आपण समाजकार्याकडे कसे वळलो याची रोमांचक कहाणी सांगितली. रस्त्याच्या कडेला अनेक मानसिक रोगग्रस्त भिकारी, सिझोफ्रेनिया झालेले, अनेकदा विवस्त्र अवस्थेत आपणास दिसतात, मात्र आपण त्याकडे पाहून क्षणभर हळवे होतो, मात्र त्यांना टाळून पुढे जातो. अशा जवळजवळ सात हजार पाचशे मनोरुग्णांना 'श्रद्धा रिहाबिलिटेशन फाऊंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी उपचार करून संबंधित रुग्णांना त्यांच्या घरी पाठवलं. बरेचदा कुटुंबाला माहिती नसतं की, घरातील व्यक्ती बेपत्ता होऊन कुठे गेली. या मनोरुग्ण व बेपत्ता व्यक्तींवर उपचार करून त्यांच्या घरी पाठवण्याचे पुण्याचे काम डॉ वाटवानी करतात.

डॉ. वाटवानी यांनी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या भेटीचा प्रसंग सांगत त्यांच्या व्यापक सामाजिक जाणिवेला बाबा आमटे यांचा परिसस्पर्श झाला असे कृतज्ञपणे नमूद केले. बाबा आमटे यांच्या प्रेरणेतूनच कर्जत येथे 'श्रद्धा रिहाबिलिटेशन सेंटर'ची शाखा काढून तेथे अनेक मनोरूग्णांना उपचार केले असे ते म्हणाले. आजपर्यंत कलकत्ता, श्रीनगर, हैदराबाद, दिल्ली, उडीसा, केरळ, तमिळनाडू, आसाम आशा अनेक ठिकाणी जाऊन डॉ. वाटवानी यांनी असे मनोरुग्ण संबंधित कुटुंबाकडे सुपूर्द केले आहेत. 'आपल्या पासून दूर राहिलेल्या आपल्याच अपत्याला पाहून कुटुंबीयांच्या डोळ्यांतून येणाऱ्या अश्रूतच मी देवाचे दर्शन घेतले' असे भावनिक उद्गार डॉ. वाटवानी यांनी काढले.

'आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपण अनेक मानसिक आजारग्रस्त रुग्णांचे पुनर्वसन केल्यामुळे प्रतिष्ठेचा रेमन मॅगसेसे पुरस्कार मला जाहीर झाला. मात्र अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे' असे डॉ. वाटवानी म्हणाले.

'लोक सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी टाळ्या वाजवतात पण काम करण्यासाठी पुढे येत नाहीत', ही खंत देखील त्यांनी व्यक्त केली.

**घाबरी करुणा जगाची लांबुनी चतकोर घाली**
**दुःख उधळायास आता आसवांना वेळ नाही।**

या बाबा आमटेंच्या ओळींचा प्रत्यय मात्र उपस्थितांच्या मनात येत होता. या सामाजिक कार्यात मोलाचा वाटा उचलण्याची जबाबदारी आता पुढच्या तरुण पिढीची असल्याने युवा पिढीने अधिक संवेदनशील होण्याची गरज डॉ. वाटवानी यांनी अधोरेखित केली.

आपल्या व्याख्यानाच्या शेवटी त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती सांगणारी एक ध्वनिचित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. महेश पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा वेदवती परांजपे यांनी केले. या व्याख्यानमालेचे थेट प्रक्षेपण इंटरनेटच्या माध्यमातून विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांत सुरू होते. या व्याख्यानास विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा**



दि. २० फेब्रुवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे हे ५ वे वर्ष असून, 'मराठी साहित्य संमेलन घ्यायला हवे का?' या विषयावर महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतून आलेल्या दहा संघांनी आपले मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, सुदृढ व निकोप चर्चा होणे हे लोकशाहीचे बलस्थान असून वादे वादे जायते तत्त्वबोध: अर्थात वादविवादातून योग्य त्या विचाराचे आकलन होते.

या स्पर्धेला वरिष्ठ पत्रकार श्री. सोनवणे व सौ. पंडित परीक्षक म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, प्रा. संतोष राणे, डॉ. विमुक्ता राजे व प्रा. मानसी जंगम यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेला गर्दी केली होती.

**त्रिमूर्तींची साठवण – आठवण**



प्रत्येक संस्कृतीचे मानदंड असतात. आधुनिक वाल्मीकी ग. दि. माडगुळकर, संगीतकार – गायक सुधीर फडके ऊर्फ बाबुजी, विनोदी लेखक पु. ल. देशपांडे हे त्रिमुर्ती म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे मानदंडच आहेत. आपल्या प्रत्येकाचे सांस्कृतिक भावजीवन या सर्वांनी समृद्ध केले. या समृद्ध व्यक्तिमत्त्वांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'त्रिमूर्तीची साठवण – आठवण' हा कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेची साक्ष देणारा आहे. या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे मानदंड निर्माण होतील, असा आशावाद जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केला. जोशी- बेडेकर महाविद्यालयातील मराठी भाषा विभाग आणि संज्ञापन व पत्रकारिता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ फेब्रुवारी रोजी कात्यायन सभागृहात आयोजित केलेल्या त्रिमूर्तीची साठवण – आठवण ! या कार्यक्रमात शुभेच्छा देताना प्राचार्या बोलत होत्या.

या त्रिमूर्तींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम सादर केला. ह्यात अभिवाचन, विविध गाणी, लावणी अशा सगळ्या प्रकारांचा समावेश होता. ह्या कार्यक्रमाची संकल्पना आणि निवेदन दिव्येश बापट ह्याचे होते, तर सुराज सोमण आणि साक्षी बागवे ह्यांनी गायन केले. युवराज ताम्हनकर ह्याने अभिवाचन करून पुलंना आदरांजली वाहिली. अथर्व चांदोरकर, प्रणव बेहेरे आणि वेदांत जामगावकर असा उत्तम वाद्यवृंद

कार्यक्रमास लाभला होता. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. अनिल भाबड, संज्ञापन व पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. सौ. संगीता दीक्षित, प्रा. संगीता मोहंती, प्रा. प्रकाश जंगले, प्रा. अविनाश वाघमारे, प्रा. प्रशांत धर्माधिकारी उपस्थित होते.

**वक्ता दशसहस्त्रेषु**

दिनांक २/३/२०१९ रोजी लोकसत्ता वक्ता दशसहस्त्रेषु ह्या स्पर्धेची प्राथमिक फेरी (ठाणे विभाग) पूर्ण झाली असून, एकूण १५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. (प्रत्येक महाविद्यालयातून २ अशी अट होती). त्या १५ पैकी एकूण ७ जणांची निवड झाली. ज्यात महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. किमया तेंडुलकर हिची निवड पुढच्या फेरीसाठी झाली असून, तिनं 'क्लोनिंग : माकडानंतरचा माणूस' हा विषय निवडला होता.

**दुबई येथे विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था व जोशी बेडेकर महाविद्यालयाचा अभ्यासदौरा**



२७ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान दुबई येथे विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ वा ना बेडेकर व्यवस्थापन संस्था व जोशी बेडेकर महाविद्यालयाचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नीतिन जोशी, डॉ. नीलम शेख, प्रा. हर्षल गांधी यांच्यासह महाविद्यालयाचे ३८ विद्यार्थी सहभागी झाले होते. डॉ. सुचित्रा नाईक यांचेही प्रोत्साहन या अभ्यासदौऱ्यासाठी मार्गदर्शक ठरले.

हा अभ्यासदौरा खालीलप्रमाणे पार पडला.

**Company Visit**

1. Al Buheira Lacnor Dairies Co LLC (UAE)
2. Mirzam Chocolate Manufacturing company

**University**

1. SkyLine University College Sharjah UAE (School of Business, VBA and MBA Programs, School of IT programs Professional Courses )

**Sightseeing**

1. Old Dubai - Dehra
2. Photo stop at Desert - some of them did desert bike ride.
3. Dubai Museums
4. Photo stop - Jumeirah Beach
5. Burj Al Arab - World Tallest 7 Star Hotel
6. Sheikh Mohammed Rashid Al Maktoum Palace (V.P and P.M of UAE and Ruler of Emirate of Dubai)
7. Visit to Dubai Mall
8. Visit to Acquarium
9. Photo Stop at Bhurj Khalifa (Tallest Building in world)

**Intellectual property Rights: in the practical paradigms या विषयावर अर्धदिवसीय कार्यशाळा**

दि. ५ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयाच्या IQAC व स्टुडन्ट फोरम तर्फे Intellectual property Rights:in the practical paradigms या विषयावर अर्धदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



या कार्यशाळेत अभिषेक पांडुरंगी व श्रीमती अदिती आठवले या ज्येष्ठ विधिज्ञांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम प्रा. नीता पाठक, प्रा. प्रज्ञा राजेबहादूर यांनी आयोजित केला. महाविद्यालयाच्या सर्व विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रा. नारायण बारसे यांचे व्याख्यान**



दि. ६ मार्च, २०१९ रोजी महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमी व व्याससभा यांच्या तर्फे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांचे Quality Indicators of Research Publication या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. संशोधनपत्रिकांमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या बाबींवर प्रा. बारसे यांनी प्रकाश टाकला. व्याख्यानास सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**"IOT-Reconnecting the World" या विषयीची एकदिवशीय राष्ट्रीय परिषद संपन्न.**

"IOT-Reconnecting the World" या विषयीची २२ वी एकदिवशीय राष्ट्रीय परिषद ही विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनच्या Instrumentation आणि Medical Electronics विभागातर्फे दि. १५ डिसेंबर २०१८ रोजी पाणिनी सभागृह कॉलेज कॅम्पस चेंदणी, ठाणे येथे सकाळी ९.०० ते ५.०० या वेळेत संपन्न झाली.

सदर परिषदेस प्रमुख पाहुणे जयंत जोशी (संस्थापक आणि अध्यक्ष RESPA In Corporation ) हजर होते. प्रमुख वक्ते चंद्रशेखर लिमये (डायरेक्टर, सुपरटेक Instrumentation सर्विसेस (इं) प्रा. लि.) उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) हजर होते.




प्रमुख पाहुणे माननीय श्री. जोशी यांच्या शुभ हस्ते मान्यवरांच्या आणि उपस्थितांच्या उपस्थितीत स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यांनी जागतिक स्तरावर भारतातील IOT संबधीचे विचार व्यक्त केले. भारतीय आर्थिक क्षेत्रात IOT चे महत्त्व सुरवातीला विषद करून त्यांनी IOT चा जनमानसात, प्रक्रिया उद्योग आणि तंत्रज्ञानात त्याचा फार उपयोग होत आहे. त्यांनी IOT (Internet of things ) च्या अंतर्गत नवीन-नवीन क्षेत्रांना आधार होत असल्याचे स्पष्ट केले.

प्रमुख वक्ते चंद्रशेखर लिमये यांनी IOT चे महत्त्व आणि त्या संबंधीच्या मुलभूत संकल्पना स्पष्ट केल्या. जेव्हा एखादा मनुष्य काही करू शकत नसेल किंवा तो धोक्यात असेल किंवा वाईट स्थितीत असेल तर त्यावेळी IOT हे अत्यंत उपयुक्त असू शकते.

सदर परिषदेदरम्यान प्रमुख पाहुणे माननीय श्री. जोशी आणि श्री. अत्रे यांचा सत्कार परिषदेचे चेअरमन डॉ. विजय बेडेकर यांनी केला. त्यांनी आपल्या भाषणात IOT संबंधीच्या उत्तम संधीचा उपयोग देशाला कसा होईल हे पाहावे असे सांगितले. व IOT संबधीच्या क्षेत्रातील विविध कोर्सेसची निर्मिती करावी असे आवाहन केले.

परिषदेची सुरुवात सौ. स्वाती जोशी यांच्या सरस्वती गायनाने झाली. दरम्यान सुरुवातीला डॉ. डी. के. नायक यांनी परिषदेमागची पार्श्वभूमी समजावून सांगितली आणि प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

परिषदेचे जॉएंट सेक्रेटरी प्रा. तुषार मोहिते-पाटील यांनी परिषदेसाठी सहकार्य केलेल्यांचे आभार प्रकट केले.

परिषदेत सादर झालेले शोधनिबंध खालीलप्रमाणे -

| **निबंध सादरकर्ते** | **विषय** |
|---|---|
| श्री. प्रदीप नाईक (Senior Manager - Business Development Mobility IOT Solutions from Tata Communications Limited) | Tata Communications : leading IOT in India |
| श्री. शकील अरकते (ManagerManager IDHMI, Schiender Electric, Mumbai ) | Augmented Reality in Industrial development |
| सौ. रुपाली जैन (Proprietor, Rubicon Systems) | Internet of Things - an overview |
| श्री. मंदार फडके (Directo, Abhisam Software Pvt. Ltd.) | Securing the Internet of Things - IOT cyber security |
| डॉ. एन. के. राणा (Principal, Theem College of Engineering Boisar, Palghar) | Application of IoT and Wireless Sensor Network as futuristic instrumentation for measurement and control |
| श्री. रोषण कुलकर्णी (Founder, and CEO, Mindstix Software Labs) | IoT cloud platforms : Foundations and architectural patterns |
| श्री. आशिष जोशी (IIOT, Architect, Mindstix Software Labs ) | |
| श्री. महेश यादव (Senior Consultant ) | Real Time -nalytics Driving Smart Manufacturing Systems |
| संध्या मांगले (Automation Trainer at Siemens Ltd. Mumbai) | Smart Energy monitoring system based on industrial IoT. |

सदर परिषदे दरम्यान Banner Banner Engineering India Pvt. Ltd. या उत्पादक कंपनीने IOT च्या विविध उत्पादनांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.

प्रत्येक सामाजिक संघटनेमध्ये एक कार्यकर्ता असतो आणि बाकीचे नऊ आळशी असतात! - रोझीनोव्ह

श्रीजयकुमार डी. पाटील (Sr. Regional Manger - West II) आणि त्यांच्या टीमने Sensors व actuators चा वापर IOT सिस्टीमद्वारे अमलात आणू शकतो असे सांगितले. सौ. किमया कोल्हे आणि टीमने Appeteria Technologies विकसित Low cost home automation systems - Switch Easy या विषयीचे प्रात्यक्षिक दाखविले आणि त्या संबंधीची माहिती दिली.

सदर परिषद ही IOT तज्ज्ञ आणि अभ्यासक यांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरली.

सरते शेवटी परिषदेच्या संघटन सचिव सौ. वैशाली जोशी यांनी मान्यवरांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे (ब्रीम्स ) तर्फे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

### The Global Economic Scenario: Its Impact On India

### जागतिक अर्थव्यवस्था : सद्यस्थिती आणि भारतावरील प्रभाव

प्रदीर्घ काळ अर्थ व्यवस्थेची एक मंद गती अनुभवल्या नंतर जागतिक अर्थव्यवस्था आताशी थोडा वेग घेतांना दिसत आहे. हा वेग काही लोकांसाठी आशा आणि अपेक्षा पल्लवित करणारा ठरत आहे. विशेषतः विकासशील देशांतील सरकार आणि धोरणकर्त्यांना दीर्घकाळ टिकणाऱ्या आर्थिक प्रगतीची चिंता आहे. जागतिक पातळीवरील आर्थिक सत्ताचे बदललेले स्वरूप, आशियातील उदयोन्मुख नवीन आर्थिक महाशक्ती, जागतिक स्तरावरील उद्योगांचे एकत्रीकरण, तीव्र स्पर्धा यामुळे उद्योगसंस्था अधिक जटिल आणि अपारंपरिक आव्हानांचा सामना करत आहेत या पार्श्वभूमीवर या सर्व परिस्थितीचा भारता सारख्या विकसनशील देशाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेवर होणारा बहुआयामी प्रभाव यावर विचारमंथन व्हावे या उद्देशाने डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे म्हणजेच ब्रीम्स तर्फे दिनांक १ आणि २ फेब्रुवारी २०१९ रोजी, 'जागतिक अर्थव्यवस्था: सद्यस्थिती आणि भारतावरील प्रभाव' (The Global Economic Scenario: Its Impact On India) या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये परिषदेच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दि. १ फेब्रुवारी २०१९ रोजी, परिषदेच्या सुरुवातीला जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील गेल्या वर्षभरातील ठळक घडामोडींवर प्रकाश टाकणारी एक ध्वनी-चित्रफीत दाखवण्यात आली. दीप प्रज्वलन आणि सरस्वती वंदने नंतर डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे ( ब्रीम्स) संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सर्व उपस्थितांचे स्वागत केले. आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात भारताचा विकास दर जरी वाढत असला तरी संधींची कमतरता, रुपयाचे मूल्य अशा अनेक मुद्यांवर भारताने आणखी जोमाने उभारी घेणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने ब्रीम्सच्या सृजन या बहुविषयक व्यवस्थापन वार्षिकाच्या विशेष संशोधन खंडाचे प्रकाशन या प्रसंगी करण्यात आले.

प्रा. कृणाल पुंजानी यांनी एका नावीन्यपूर्ण पद्धतीने या प्रकाशनाचे सादरीकरण केले.

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या प्रसंगी केलेल्या संबोधनात या परिषदेचे महत्त्व विषद करताना सांगितले की,

जगातील माहितीच्या विस्फोटातून / महापुरातून योग्य माहिती तुमच्या पर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. अर्थव्यवस्था ही फक्त पैशाशी संबंधीत नाही तर ती अनेक उपक्रमांची व्यवस्था आहे. आणि शिक्षण हा देखील एक महत्त्वाचा उपक्रम आहे आणि त्याचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर नक्कीच पडतो.

या नंतर ब्रीम्सच्या नेहमीच्या पद्धती प्रमाणे पुढील वर्षीच्या परिषदेच्या विषयाची घोषणा ब्रीम्सचे सरसंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी केली. Edu-Future For Sustainable World Economic Order: Research, Innovation Technology हा विषय पुढील वर्षीच्या परिषदेसाठी ठरविण्यात आला आहे.

सर्व आमंत्रित तज्ज्ञांच्या सत्काराबरोबरच मुंबई स्टॉक एक्सचेंज द्वारा आयोजित स्टॉक टोरेरो २०१८ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

परिषदेचे प्रमुख अतिथी आयएमसी चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री चे आर्थिक सल्लागार, आयएमसी-इकॉनॉमिक रिसर्च अँड ट्रेनिंग फाऊंडेशन्चे संचालक, आणि हिंदू बिझनेस लाइनचे वरिष्ठ पत्रकार श्री. जी. चंद्रशेखर गुरुस्वामी अय्यर यांनी जागतिक अर्थव्यवस्थे संदर्भात आपल्या सादरीकरणात सांगितले की, २०१८ मधील VUCA (volatility, uncertainty, complexity and ambiguity) म्हणजेच अस्थिरता, अनिश्चितता, जटिलता आणि अस्पष्टता असलेली अर्थव्यवस्थेची स्थिती आजही कायम आहे. खनिज तेलाचे वाढते भाव, भू-राजनैतिक संबंध, संरक्षणवाद, वाढणारे व्याजदर या सर्व पार्श्वभूमीवर २०१९ मधील जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र वर्णन करत असताना, वाढणारी जागतिक बाजारपेठ, जागतिक व्याज दराची २.९% पर्यंत अपेक्षित घसरण, बाजारपेठांचे एकत्रीकरण, राजकीय अस्थैर्य, विदेशी गुंतवणूक , रोजगारांच्या संधी अशा विविध मुद्यांवर त्यांनी भाष्य केले.

या नंतर परिषदेच्या विषयसूत्रासंदर्भात आपले विचार मांडताना ब्रीम्सचे सरसंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी अमेरिका, चीन आणि भारताचा विकासदर, व्यापार, कर व्यवस्था, कर्ज व्याजदर इत्यादी संदर्भात तुलनात्मक व अभ्यासपूर्ण विवेचन सादर केले.

परिषदेतील दुसरे व्याख्याते लोकसत्ता दैनिकाचे संपादक आणि अर्थतज्ज्ञ गिरीश कुबेर यांनी, सध्याचा एच १ व्हिसा वाद आणि बँकांची/ कंपन्यांची दिवाळखोरी / कर्जबाजारी इत्यादी मुद्यांच्या पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्थेच्या विषयावरील ही परिषद खूप महत्वाची आहे असे मत व्यक्त केले. १६व्या शतकात ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या 'विश्वची माझे घर' या उक्तीची परंपरा असलेल्या आपल्या देशाला जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारायला १९९१ साल उजाडावे लागले आणि आता पुन्हा आपल्याकडे स्वदेशी आणि संरक्षणवादाचे वारे वाहू लागले आहेत. हे भारतीय अर्थव्यवस्थेला परवडणारे नाही. अर्थव्यवस्थेचा राजकीय दृष्टीने विचार करता राज्यकर्त्यांनी मायबाप होऊन जनतेचे प्रश्न सोडवण्यापेक्षा, प्रश्न निर्माणच होणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे आणि जनतेनेही आणि विशेषतः विद्यार्थ्यांनी अर्थव्यवस्था विषयक आंधळे म्हणजे अर्थांधळे न होता आणि संरक्षणवादाला पाठिंबा न देता, देशाच्या आर्थिक धोरणाकडे कोणत्याही राजकीय पक्षाच्या दृष्टीने न पाहता निष्पक्षपणे भारताच्या विकासाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे असे त्यांनी सांगितले. तसेच 'अंथरूण पाहून पाय पसरावे' ही वृत्ती सोडून 'अंथरूण वाढवून इतरांनाही त्यावर बसावा' असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

परिषदेतील तिसरे व्याख्याते लॉजिक मिल्स सिंगापूरचे संचालक श्री. मार्क नोवाकी, यांनी सिंगापूर अर्थव्यवस्थे संदर्भात भाष्य करताना आर्थिक आणि

सामाजिक आव्हाने, माहितीसाठी विकी पीडियावरील अवलंबित्व, लुप्त होत जाण्याची शक्यता असणारे व्यवसाय, प्रचलित व्यावसायिक कार्य पद्धतीशी फारकत घेणारी गिग इकॉनॉमी, सिंगापूर अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक गृहसंस्था, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक आरोग्य, भविष्यातील कौशल्ये तसेच २१ व्या शतकासाठी पूरक कौशल्ये शिकवणारी लॉजिक मिल्स इत्यादी विषयावर माहिती दिली .

परिषदेतील चौथे व्याख्याते फिलीपिन्स येथील अस्म्पम्पशन डेल पिअर विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटिंग सायन्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी (सीसीएसआयटी) चे डीन, डॉ. जोय मिरांडा सुबा यांनी फिलीपिन्सचा आर्थिक विकास, उज्ज्वल भविष्य, फिलिपिन्स सरकारच्या विविध योजना;- जसे स्टॅटेजिक डेव्हलोपमेंट प्लॅन २०१७-२२, गुंतवणूक कार्यक्रम, हाय इम्पॅक्ट प्रोग्रॅम, अग्रिलिंक, तसेच आर्थिक विकासातील संभाव्य धोके इत्यादी संदर्भात माहिती सांगितली.

परिषदेतील पाचवे व्याख्याते नायजेरियाच्या एल. अँड झेड. इंटिग्रेटेड फार्म नायजेरिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. एम. डी. अबुबाकर यांनी नायजेरिआची अर्थव्यवस्था आणि भारता वरील प्रभाव, नायजेरियातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीवर भारतीयांचे वर्चस्व, या संदर्भात माहिती दिली. तसेच स्वतः अत्यंत बिकट परिस्थितीतून मार्ग काढत दुग्ध व्यवसाय कसा सुरू केला. दुग्ध व्यवसाय क्षेत्रात भारतातील दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. कुरियन यांना ते गुरुस्थानी मनात असल्याचे देखील त्यांनी सांगितले. तसेच नायजेरियातील प्रतिकूल परिस्थितीच्या तुलनेत तुम्हाला इथे खूप चांगल्या सुविधा मिळत आहेत तेव्हा शिकत असताना कोणतीही कारणे देत बसू नका असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

परिषदेतील सहावे व्याख्याते एसजीएस येथील कृषी आणि अन्न, दक्षिण आशिया विभागाचे संचालक श्री. श्यामल गुप्ता यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील तसेच आयात-निर्यात क्षेत्रातील विविध प्रवाह, व्यापार या विषयावर आपली मते मांडली.

परिषदेतील सातव्या व्याख्यात्या चीन मधील न्यू सेलिंग सर्विसेसच्या पश्चिम भारत विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अल्मा झॅन्ग यांनी त्या भारतात आल्यापासूनचे भारत आणि भारतीयांबद्दलचे त्यांचे अनुभव सर्वांना सांगितले, तसेच चीन मधील उद्योग संस्था भारतातील विविध उद्योग संधींसाठी उत्सुक असल्याचेही त्यांनी सांगितले.

परिषदेतील शेवटचे व्याख्याते स्टॉलवार्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे संस्थापक संचालक व इंडो ग्लोबल एसएमई चेम्बरचे अध्यक्ष, श्री. भरत कुलकर्णी यांनी BRI म्हणजेच बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह प्रकल्पाबद्दल विस्तृत माहिती सांगितली. तसेच त्याचा अर्थव्यवस्थेवर पडणाऱ्या प्रभावाची शक्यता, या प्रकल्पातील महत्त्वाचे टप्पे, त्याचे भविष्य, तसेच आशिया आफ्रिका ग्रोथ कॉरीडोर या नवीन प्रकल्पाबद्दल देखील त्यांनी थोडक्यात सांगितले.

ब्रीम्सच्या प्राध्यापिका डॉ. स्मिता जपे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.



परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. २ फेब्रुवारी २०१९ रोजी शिक्षक, संशोधक, व व्यावसायिकांसाठी परिषदेच्या विषयसूत्रावर आधारित शोध निबंध स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी यंग बिझ विझार्ड - बिसनेस प्लॅन चॅलेंज या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ब्रीम्सच्या प्राध्यापिका डॉ. स्मिता जपे आणि प्रा. सुषमा दवे परिषदेच्या, तसेच स्पर्धेच्या समन्वयक होत्या. या स्पर्धांमध्ये ठाणे उपनगर आणि मुंबई विभागातील विविध महाविद्यालयांतील अनेक शिक्षक तसेच उद्योग संस्थांचे व्यवस्थापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शोध निबंध स्पर्धांमध्ये कृष्णन सुब्रमनिअन यांना प्रथम क्रमांकाचे तर शंकर चॅटर्जी यांना द्वितीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. तर यंग बिझ विझार्ड - बिसनेस प्लॅन चॅलेंज या स्पर्धेमध्ये ब्रीम्सच्या प्रणिता कोठावडे व अक्षय गौड यांच्या संघाला प्रथम क्रमांकाचे तर आय. इ. एस. महाविद्यालयाच्या सिद्धी पोवळे, धारा थानकी व निकिता दाभोळकर यांच्या संघाला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. बक्षीस समारंभानंतर परिषदेची सांगता करण्यात आली.



६ फेब्रुवारी: मुंबई येथील एसएनडीटी विद्यापीठातील 'बीएमके' नॉलेज रिसोर्स सेंटरच्या कर्मचारी व ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या 'कोहा ग्रंथालय व्यवस्थापन सॉफ्टवेअर' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेसाठी ब्रीम्सचे ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांना तज्ज्ञ व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.



६ फेब्रुवारी: डॉ. पल्लवी चांदवस्कर आणि प्रा. महेश भानुशाली यांनी आरबीएनक्यूए बेस्ट प्रॅक्टिसिस-जर्नल क्लबसाठी आपले लेखन रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी अवर्ड ट्रस्टला नामांकनासाठी पाठवले.

९ फेब्रुवारी: प्रा. प्रवीण नारंग यांनी माजी विद्यार्थिनी नमता मिस्त्री साठी शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन केले.

९ फेब्रुवारी: रेमंड लिमिटेड कंपनीच्या डिजिटल आयटी विभागाचे प्रमुख कृष्णन सुब्रमण्यम आणि ब्रीम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांच्यासह एका टॉक शो आयोजन करण्यात आले.




१० फेब्रुवारी: ब्रीम्सच्या संघाने हिरानंदानी ठाणे अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतला.

सुखाचे दिवस कसे लहान आणि दुःखाचे कसे मोठे वाटतात् - जिनइंगेलो



१० फेब्रुवारी: ब्रीम्सने पीतांबरी प्रॉडक्ट प्रा.लि. येथे डॉ. नीतिन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार सेवा सुरू केली.

११ फेब्रुवारी: एम एम एस २०१६-१८ तुकडीच्या पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले.



१६ फेब्रुवारी: ब्रीम्सच्या विद्यार्थी व शिक्षकांनी पुलवामा शहीदांना श्रद्धांजली वाहिली.



२० फेब्रुवारी: प्रा. सचीन भुसारी यांनी पीजीडीएम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनां वर्गाबाहेर परिसरा मध्ये एका सुसज्ज शेड अंतर्गत शिकविले. परिणाम म्हणजे: अधिक संवाद, सर्जनशीलता आणि विद्यार्थ्यांचा चांगला सहभाग या तासाला लाभला.



२८ फेब्रुवारीः डॉ. स्मिता यांनी विद्यार्थिनींसाठी आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी Its time we talk या महिलांविषयक माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन केले त्यामध्ये डॉ. नुंदा, डॉ. थोरसरंद व डॉ. पाटर या प्रसिद्ध स्त्री रोग तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

२८ फेब्रुवारी: डॉ. विजय बेडेकर, डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. हर्षल गांधी, इ पी एम बी ए अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसह आंतरराष्ट्रीय औद्योगिक सहली साठी दुबईला गेले. त्यांनी लेसर डेयरी एलएलसी, मिर्जम चॉकलेट्स आणि स्काईलाइन युनिव्हर्सिटीला भेट दिली.



क्रीएटिव्ह फाउंडेशन द्वारा आयोजित, स्टुडन्ट ऑफ द इयर २०१८ (Student of the Year Contest - 2018) च्या इव्हेंट मॅनेजमेंट फेरीत विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी आमच्या विद्यार्थ्यांना सन्माननीय प्रमाणपत्र देण्यात आले.




संकटावर नामी उपाय म्हणजे संकट. - जॉर्ज हर्बर्ट

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

मानवतावादीही त्यांचीच री ओढत असत.

अमेरिकेत शुद्ध वंशवादामुळे बळी पडलेल्या, अर्थातच संख्येने जास्त कृष्णवर्णीय अमेरिकनांच्याबद्दल यांना का बरं कधीच कणव येत नाही? ते बहुतांशी कृष्णवर्णीय आहेत म्हणून, का त्यांचे मारेकरी हे श्वेतवंशवादाने झपाटलेले आहेत म्हणून? अमेरिकेतून स्फूर्ती घेऊन सधन युरोपीय राष्ट्रामध्येही याच घटना गेली कित्येक वर्षे अशाच घडत आहेत. वाद घालायचा तो त्यांना 'दहशतवादी' म्हणायचं, की 'माथेफिरू' म्हणायचं यावर!

अमेरिकेमधील अनेक राज्ये आजही श्वेतवंशवादानी प्रभावित झालेली आहेत.




**अमेरिकेतील न्यू ऑर्लीएन्स, लुईझियाना राज्यातील १८९१ साली उभारलेला श्वेतवर्ण वर्चस्वाच्या विजयाचा स्तंभ. बऱ्याच विरोधा नंतर २०१७ साली त्याला हलवण्यात आले.**

'Battle of Liberty Place' हे स्मारक, लूयीसियाना (Louisiana) या अमेरिकेतील राज्यामध्ये १८९१ साली उभारले गेले. १९३२ साली त्यामध्ये खालील ओळींची भर टाकण्यात आली,

"Recognised white Supremacy in the South and gave our state".

अलीकडेच म्हणजे २०१७ साली बरीच आंदोलनं केल्यावर या स्मारकाला तिथून हलवण्यात आले.

रुडयार्ड किप्लिंग (Rudyard Kipling, 1865-1936) यांना साहित्याचं नोबेल पारितोषिक १९०७ साली मिळालं. त्यांचा जन्म मुंबईतील. इंग्रजी साहित्यातील महत्त्वाचे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. वसाहतवादाचे आणि श्वेतवंशवादाचे ते कट्टर समर्थक होते. १८८९ साली त्यांनी 'The Ballad of East and West" ही कविता लिहिली. त्यातील –

> "Oh, East is East, and West is West,
> and never the twain shall meet."

या ओळी त्यांची साम्राज्यवादी मानसिकता दर्शवणाऱ्या आहेत. त्यांची सर्वात प्रसिद्ध कविता म्हणजे 'The White Man's Burden'. भारतातील काय किंवा अमेरिकेच्या फिलीपाइन्समधील काय, साम्राज्यवादांच्या समर्थनाकरता वापरली गेलेली प्रेरणा म्हणजे ही कविता. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या हीरक महोत्सवानिमित्त किप्लींग साहेबांनी दि. २२ जून १८९७ रोजी राणीला ती अर्पण केली. यातला प्रत्येक शब्द हा श्वेतवंशवादाचे समर्थन करणारा आहे.

विकिपिडियाच्या White Man's Burden वरील टिपणीमध्ये या संदर्भातील नोंद बोलकी आहे.

'The imperialist interpretation of 'The White Man's Burden' (1899) proposes that the 'white race' is morally obliged to rule the 'non-white' people of planet Earth, and to encourage their progress (economic, social and cultural) through


टक्कल पडलेली अनेक डोकी मुकुटाने झाकलेली असतात! – इमरसन

settler colonialism, which is based upon the Roman Catholic and Protestant Misslonaries displacing the natives' religion: The Implication of coure, was that the Empire existed not for the benefit - economic or strategic or otherwise of Briton, itself, but in order that primitive peoples incapable of Self-Government, could with British guidance, eventually become civilized (and Christianised)

किप्लींग यांची ही कविता लंडनच्या The Times ने ४ फेबुवारी १८९९ ला व अमेरिकेतील प्रथितयश वृत्तपत्रांनी प्रकाशित केली होती. फिलीपाइन बेटांच्या अमेरिकन साम्राज्यवादाचे समर्थन करण्याकरता देखील १८९९ ला या कवितेमधील काही ओळींचे अमेरिकेच्या सिनेटमध्ये वाचन करण्यात आले. अर्थातच प्रसिद्ध अमेरिकन साहित्यिक मार्क ट्वेन यांनी किप्लींगच्या साम्राज्यवादी विचारांना विरोध केला. एवढेच नाही तर, त्यांनी या कवितेवर उपहासात्मक 'To the person sitting in darkness' (1901) हा लेख लिहिला.

इ.एम. फार्स्टर हे दुसरे महत्त्वाचे इंग्रजी कादंबरीकार. त्यांची A Passage to India (1924) ही कादंबरी वरकरणी वसाहतवादाला विरोध करणारी वाटली तरी, आधुनिक टीकाकारांनी त्यामधील वसाहतवादाचे केलेले समर्थन दाखवून दिले आहे.

१८९० सालच्या प्रसिद्ध पिअर्स सोपच्या जाहिरातीमध्ये 'The White Man's Burden' चा वापर करण्यात आला आहे. थोडक्यात; श्वेतवंशवादाचा हा इतिहास ही एखादी अपघाती घटना नसून, अमेरिका व इतर युरोपीय राष्ट्रांमध्ये तेव्हा, आणि आजही ती तेवढ्याच तीव्रतेने अस्तित्वात आहे. भारतासारख्या देशाला शांतता किंवा मानवतावाद शिकवण्याचा काकणभर अधिकारही या देशांना नाही. मानवतावादी विचारांची ती क्रूर चेष्टा आहे.




**प्रसिद्ध पिअर्स साबणाची १८९० मधील जाहिरात.**

कृष्णवर्णीय किंवा स्थलांतरीत लोकांवर बेछूट गोळीबार करणारे आपला जाहीरनामाही (Manifesto) प्रकाशित करत असतात. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाने पछाडून लाखो ज्यूंची हत्या करणाऱ्या अडॉल्फ हिटलर यांनी १९२५ साली आपला जाहीरनामा प्रकाशित केला होता.

न्यूझीलंड येथे ५० जणांची हत्या करणाराही श्वेतवंशवादानी भारला तर होताच, पण त्यानीही हत्येआधी ७४ पानी आपला जाहीरनामा प्रकाशित केला होता. या आधी अशा प्रकाशित झालेल्या जाहीरनाम्यांच्या आणि या जाहीरनाम्यांतील प्रेरणा या सारख्याच आहेत. जाहीरनाम्याच्या सुरुवातीलाच हत्याकांडाचे समर्थन करताना तो म्हणतो :

---

शूराला दुष्टपणा शोभत नाही. – होमर

"to show the invaders that our lands will never be their lands, our homelands are our own and that, as long as a white man still lives, they will never conquer our lands."

याआधी अशी हत्या केलेल्या अनेकांचे उल्लेख करून, ते आपले आदर्श कसे आहेत याचीही तो वर्णने करतो. थोडक्यात; श्वेतवंशवादाची ही कीड अमेरिका आणि युरोपमधील अनेक राष्ट्रांमध्ये आज धगधगती आहे. युरोपमधील राजकीय वाऱ्यांची आजची दिशा आपण बघितली, तर ती स्थलांतरितांच्या विरुद्ध आणि श्वेतवंशवादानी पछाडलेली आहे.

अमेरिकेपासून, युरोपमधल्या अनेक अशा सधन देशांचा इतिहास, हा फक्त ५०० ते १।।-२ हजार वर्षांचा आहे. भारताला कमीत कमी ५००० वर्षांची परंपरा आहे. त्यांची समाजव्यवस्था ही प्रबोधन युगापर्यंत तरी ॲरिस्टॉटल, टोलेमी आणि बायबलकेंद्रित होती. पुढे वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांतीनी यामध्ये बदल नक्की केला. १९ व्या - २० व्या शतकांत धर्मविचारापासून कला आविष्कारापर्यंत 'स्वातंत्र्याचे' वारे वाहू लागले. लग्नापासून अनेक सामाजिक संस्था या कालबाह्य होऊन, एका आत्मकेंद्रित समाजाची निर्मिती झाली. लेखन स्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य, व्यक्ती स्वातंत्र्य याचा इतका अतिरेक झाला की, ते 'स्वैराचारा'च्या सीमेवर येऊन उभे राहिले. आत्मकेंद्रित व्यवस्थेमध्ये तात्पुरता फायदा असला तरी, लवकरच त्यामुळे 'वैफल्य' येते. अशा सधन पण वैफल्यग्रस्त समाजामधूनच २०व्या शतकाच्या उत्तरार्धात हिप्पी पंथ निर्माण झाला. आम्ली औषधांच्या सेवनाचे प्रमाण वाढले. ऐहिक क्षेत्रात प्रचंड वैज्ञानिक प्रगती होत असली तरी, मनुष्य अधिक असमाधानी आणि वैफल्यग्रस्त होत होता. न्युझीलंड सारख्या हत्या आणि त्यांचे वाढते प्रभाव हे या वैफल्याचेच प्रतिबिंब आहे.

पाश्चिमात्य संस्कृती, कला आणि समाज संस्थांचे अंधानुकरण करत आपणही स्वातंत्र्याच्या सीमांना स्वैराचारापर्यंत नेऊन ठेवलं आहे. भारतीय संस्कृती ही हजारो वर्षांची आहे. अगदी १६ व्या शतकापर्यंत विज्ञान, कला आणि भाषेच्या सृजनशिलतेमध्ये ती आपले सांस्कृतिक, सामाजिक वैशिष्ट्ये जपून होती. अनेक मतमतांतरे असली तरी ती असहिष्णू नक्कीच नव्हती. उलट पारशी, ज्यू स्थलांतरितांना तिने सहज सामावून घेतले. भारतीय समाजव्यवस्था ही सर्वथा वेगळी होती. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मानवी क्षमतांचा विचार करत त्याची उभारणी केली होती. कुटुंब हा त्याचा केंद्रबिंदू होता.

प्रश्न एवढाच आहे की, आर्थिक सुबत्तेच्या शिखरावर असलेली अमेरिका आणि त्याची युरोपियन भावंडं, त्यातील वर्णद्वेश, त्यातून येणारी वैफल्यग्रस्तता, आणि त्याचा परिपाक म्हणून न्युझीलंडसारखे होणारे प्रकार, यातून आपण काही शिकणार आहोत का? सध्या आपली परिस्थिती 'न घरका न घाटका' अशी झाली आहे.

**- डॉ. विजय बेडेकर**

•••



Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.